सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १३५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २० जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ‘परिवार का साथ, परिवार का विकास...’
## बिहारमधून पीएम मोदींची काँग्रेस-राजदवर खोचक टीका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०सिवान बिहार**

या वर्षाच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा एकदा बिहारच्या दौऱ्यावर गेले आहेत. आज त्यांनी सिवान येथून राज्यासाठी पाणी, रेल्वे आणि वीज क्षेत्रासह १० हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी केली आणि उद्घाटन केले. सिवानमधील रॅलीला संबोधित करताना पीएम मोदी म्हणाले की, 'हे सर्व विकास प्रकल्प बिहारला उज्ज्वल भविष्याकडे घेऊन जातील. आम्ही दाखवून दिले की, गरिबी कमी करता येते. जागतिक बँकदेखील भारताची प्रशंसक बनली आहे.'

पंतप्रधान पुढे म्हणाले, 'मी कालच परदेशातून परतलो आहे. या दौऱ्यादरम्यान मी अनेक नेत्यांशी बोललो. सर्व नेते भारताच्या विकासाने खूप प्रभावित झाले आहेत. ते भारताला तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनताना पाहत आहेत. बिहार यामध्ये खूप मोठी भूमिका बजावणार आहे.'पंतप्रधान मोदींनी काँग्रेस आणि राजदवर निशाणा साधला. पंतप्रधान म्हणाले, मी बिहारच्या लोकांना आत्मविश्वास देण्यासाठी आलो आहे. पंजा आणि कंदीलवाल्या लोकांनी मिळून बिहारच्या अभिमानाला धक्का पोहोचवला आहे. या लोकांनी मिळून राज्याला इतके लुटले की, गरिबी बिहारचे दुर्दैव बनले. अनेक आव्हानांवर मात करुन मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली बिहारला पुन्हा विकासाच्या मार्गावर आणले आहे.आम्ही राज्यासाठी खूप काही केले, करत आहोत आणि पुढेही करत राहू. गेल्या १० वर्षांत बिहारमध्ये ५५ हजार किलोमीटर ग्रामीण रस्ते बांधले गेले आहेत. १.५ कोटींहून अधिक घरांना वीज मिळाली आहे. १.५ कोटी लोकांना पाण्याचे कनेक्शन दिले आहे.

पंतप्रधान म्हणाले, 'आपल्या देशाने गरीबी हटावचे बरेच नारे ऐकले, पण जेव्हा तुम्ही आम्हाला संधी दिली, आमच्या सरकारने दाखवून दिले की, गरिबी कमी करता येते. गेल्या दशकात, विक्रमी २५ कोटी भारतीयांनी गरिबीवर मात केली आहे. जागतिक बँकेसारख्या जगातील नामांकित संस्था भारताच्या या कामगिरीचे कौतुक करत आहेत. काँग्रेस आणि राजदच्या राजवटीत गरिबांना घरे मिळाली नाहीत, उपचार नव्हते, शिक्षण नव्हते, वीज नव्हती, गॅस कनेक्शन नव्हते, नोकऱ्या नव्हत्या. गरिबी हटवण्याचे स्वप्न दाखवून त्यांचे स्वतःचे कुटुंब करोडपती झाले'

### तुमच्यासाठी काम करत राहील..

आपल्या पक्षाच्या यशाचे मोजमाप करताना पंतप्रधान म्हणाले, '४ कोटी लोकांना कायमस्वरूपी घरे मिळाली आहेत. सिवानमध्ये १ लाखाहून अधिक लोकांसाठी कायमस्वरूपी घरे बांधण्यात आली आहेत.

## गरिबांच्या मुलांनी इंग्रजी भाषा शिकावी, हे भाजपा - आरएसएस ला नकोय : राहुल गांधी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नवी दिल्ली**

काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी(दि.२०) भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वर इंग्रजी भाषेवरुन जोरदार हल्ला चढवला. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर एक व्हिडिओ पोस्ट करत म्हटले की, 'भारतातील गरिबांच्या मुलांनी इंग्रजी शिकू नये, असे भाजप आणि आरएसएसला वाटते.'

इंग्रजी भाषेचे महत्त्व अधोरेखित करताना राहुल गांधी म्हणतात, 'इंग्रजी हे धरण(अडथळा) नाही, तर एक पूल आहे. इंग्रजी लाज वाटण्यासारखी गोष्ट नाही, तर ती एक शक्ती आहे. इंग्रजी ही साखळदंड नाही, तर ती साखदंड तोडण्याचे साधन आहे. आजच्या जगात इंग्रजी ही व्यक्तीच्या मातृभाषेइतकीच महत्त्वाची आहे. ही भाषा केवळ रोजगाराच्या संधी निर्माण करत नाही, तर आत्मविश्वासही वाढवते.'

राहुल गांधींनी यावेळी भारतीय भाषांचे महत्त्वही अधोरेखित केले. ते म्हणाले, 'भारतातील प्रत्येक भाषेत आत्मा, संस्कृती, ज्ञान आहे. आपण त्यांचे पालनपोषण केले पाहिजे. प्रत्येक मुलाला इंग्रजी शिकण्याची समान संधी मिळाली पाहिजे. जागतिक स्पर्धेत भारताला मजबूत बनवण्याचा आणि देशातील प्रत्येक मुलाला समान व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हाच मार्ग आहे,' असे त्यांनी म्हटले.

## बोलबच्चन भैरवी असलेल्यांना उत्तर देत नाही
### देवेंद्र फडणवीस यांची उद्धव ठाकरे यांच्यावर टीका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०जळगाव**

शिवसेनाप्रमुखांचा ब्रँड पुसून टाकण्याचा प्रयत्न केल्यास भाजपचे नामोनिशाण महाराष्ट्रातून मिटवून टाकू, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी गुरूवारी मुंबईत पार पडलेल्या पक्षाच्या मेळाव्यात दिला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बोलबच्चन भैरवींना मी उत्तर देत नाही, अशी टीका ठाकरे यांचे नाव न घेता केली.

कम ऑन किल मीहिंमत असेल तर अंगावर यापण अंगावर येणार असाल तर एक गोष्ट नक्की करा, अमिताभच्या चित्रपटात तो ॲम्बुलन्स घेऊन येतो तशी ॲम्बुलन्स घेऊनच या. कारण तुम्ही पायावर चालत जाणार नाही, तर जाताना आडवे होऊन स्ट्रेचरवर जाल, असा आसूड उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील मेळाव्यात ओढला होता. ठाकरे यांच्या या टिकेला उत्तर देताना शुक्रवारी जळगाव येथे देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना बोलबच्चन भैरवी अशी उपाधी दिली. अशांना मी उत्तर देत नाही, असा टोलाही त्यांनी हाणला.

क्रांतिवीर ख्वाजा नाईक यांच्या स्मारकाचे लोकार्पण आणि ग्रामीण रुग्णालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी धरणगाव येथे केले. तत्पूर्वी, जळगाव विमानतळावर आगमन झाल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात आदिवासी समाजाचे मोठे योगदान राहिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व आदिवासी स्वातंत्र्य सेनानींचा गौरव झाला पाहिजे, यासाठी वेगवेगळे कार्यक्रम काही वर्षांपासून हाती घेतले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून क्रांतिकारी नाईक यांच्या स्मारकाच्या भूमिपूजनासाठी यापूर्वी धरणगावात आलो होतो. आता स्मारकाच्या उद्घाटनाची संधीही मिळाली, असे फडणवीस यांनी नमूद केले.

## माजी मंत्री धनंजय मुंडेंना हायकोर्टाचा मोठा दणका
### पोटगीतील ५०% रक्कम तातडीने न्यायालयात जमा करण्याचे निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०बीड**

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. करुणा शर्मा यांना लागू झालेल्या पोटगीतील ५०% रक्कम चार आठवड्यात न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयानंतर करुणा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केले आहेत. मुंडे हे मूळात चांगले आहेत, पण त्यांच्यामागे असलेल्या ‘दलाल गँग'मुळेच त्यांची चुकीची पावलं पडत आहेत, असा दावा करुणा मुंडे यांनी केला. सोबतच कोर्टाची मी आभार मानते, त्यांनी मला न्याय दिला. अशी प्रतिक्रिया ही त्यांनी यावेळी दिली आहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी वांद्रे येथील कुटुंब न्यायालयाने करुणा मुंडे यांना पोटगी पोटी देण्यात येणाऱ्या २ लाख रुपये रकमेच्या विरोधात उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणी प्रकरणात धनंजय मुंडे यांनाच उच्च न्यायालयाने दणका दिल्याच पाहायला मिळत आहे. वांद्रे दंडाधिकारी न्यायालयाने काही दिवसांपूर्वी करुणा शर्मा या पोटगीस पात्र असल्याचं मान्य करत त्यांना दरमहा १ लाख २५ हजार रुपये देण्याचे आदेश दिले होते. यालाच धनंजय मुंडे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं आणि यावर गुरुवारी उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या एकलपीठापुढे सुनावणी पार पडली आणि न्यायमूर्ती यांनी धनंजय मुंडे यांनाच दणका दिला.माझे सगळे पैसे जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत मी शांत बसणार नाही, असेही त्या म्हणाल्या.

## राज- उद्धव ठाकरेंच्या युतीला ब्रेक? मनसे नेत्याच्या विधानानंतर चर्चेला उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

मनसे-शिवसेना ठाकरे गट युती हा आमचा एकमेव विषय नाही. राज ठाकरे हे योग्यवेळी युतीबाबत निर्णय घेतील. पण अचानक युतीसाठी इतका उत्साह का? उद्धव ठाकरेंचे ६० आमदार निवडणून आले असते तर आमचा विचार केला असता का? असा सवाल करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांनी राज-उद्धव ठाकरेंच्या युतीच्या चर्चांवर पूर्णविराम घालण्याचा प्रयत्न केला. संदीप देशपांडे हे पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी देशपांडे यांनी ठाकरे गटाला प्रश्न करत इशारा दिलाय.

गेल्या काही दिवसांपासून राज-उद्धव ठाकरेंची युती होणार असल्याची सुरू झालीय. ठाकरे बंधू एकत्र आल्यास राज्यातील राजकरणात मोठी उलथापालथ होणार असल्याचा अंदाज



वर्तवला जात आहे. ठाकरे गट शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या मेळाव्या बोलताना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंनी मनसेसोबत युती करण्याबाबत सकारात्मक संकेत दिले. यामुळे राज-उद्धव युती होण्याच्या चर्चा जोरात सुरू झाल्या.

ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याने राज्यात नवी राजकीय वारे वाहतील अशी चर्चा सुरू झाली. मात्र मनसे नेते संदीप देशपांडे यांच्या एका विधानामुळे मात्र युतीला ब्रेक लागण्याची शक्यता आहे. अचानकच ठाकरे गटाला युतीचा पुळका का आला? युतीबाबत इतका उत्साह आता का? असे प्रश्न संदीप देशपांडे यांनी केल्यानं युतीच्या शक्यतेवर वादाचे ढग दाटलेत. राज्य सरकारने पहिलीपासून हिंदी विषय लागू करण्याबाबत अध्यादेश लागू करण्यावरुन मनसे आक्रमक झाली आहे.

## दोन्ही संघानी काळी पट्टी बांधत वाहिली श्रध्दांजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

आज पासून भारत - इंग्लैंड क्रिकेट कसोटीला सुरुवात झाली आहे. १२ जून रोजी गुजरातची राजधानी अहमदाबाद येथे एअर इंडियाचे विमान क्रश झाले. या विमानात २४२ लोक होते, ज्यात २३० प्रवासी आणि १२ क्रू मेंबर्स होते. अहमदाबादहून लंडनला जाणारे हे विमान विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांत एका हॉस्टेलवर क्रश झाले, ज्यामुळे विमानातील २४१ जणांचा मृत्यू झाला आणि या अपघातातून फक्त एकच व्यक्ती वाचली.

त्याच वेळी, हॉस्टेलमधील अनेक जणांना आपला जीव गमवावा लागला. अहमदाबाद विमान अपघातात एकूण २७० लोकांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताबद्दल ईसीबी आणि बीसीसीआय त्या लोकांना श्रद्धांजली वाहिली.

## अपघातग्रस्त विमानाच्या ढिगाऱ्यात सापडलं ८० लाखांचं सोनं आणि रोकड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अहमदाबाद**

अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला १२ जून रोजी भीषण अपघात झाला. या दुर्घटनेनंतर घटनास्थळावरुन सुमारे ८० लाख रुपये किमतीचे सोने आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली. आता हे मौल्यवान वस्तू कोणाला मिळणार आणि त्याचा वारसदार कोण असणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. बचावकार्यादरम्यान ७० तोळे सोने, ५० हजार रुपये आणि काही अमेरिकन डॉलर्स अशी रोख रक्कम पोलिसांकडे जमा करण्यात आली आहे.

अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर ढिगाऱ्यातून मृतदेह आणि इतर वस्तूंबरोबरच मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने आणि रोख रक्कमही मिळाली. राजेश पटेल यांच्यासह काही जण १२ जून रोजी विमान दुर्घटनेनंतर तातडीने घटनास्थळी मदत आणि बचावकार्यासाठी पोहोचले होते. हा अपघात झाला, तेव्हा आपण घटनास्थळापासून केवळ ३०० मीटर अंतरावर होतो, असं राजेश पटेल यांनी सांगितलं.

राजेश पटेल यांनी अनेक मृत आणि जखमींना रुग्णवाहिकेपर्यंत पोहोचवले. त्यानंतर ते परत घटनास्थळी आले. जळत्या विमानाच्या ढिगाऱ्यातून त्यांनी जवळपास ७० तोळे सोन्याचे दागिने, ५० हजार रुपये आणि काही अमेरिकन डॉलर्स जमा केले आणि ते पोलिसांना सोपवले.विमानात प्रवास करत असलेल्या व्यक्तींच्या कायदेशीर वारसांना त्या मिळतील. नियमानुसार, मृत व्यक्तीच्या वारसांना त्यांची ओळख पटल्यानंतरच या वस्तू प्राप्त होतील.

## सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसवण्यासाठी पुन्हा मुदतवाढ, यापुढे संधी नाही?




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट लावण्याची अंतिम मुदत आता पुन्हा एकदा वाढवण्यात आली आहे.वाहनधारकांना मोठा दिलासा देत, परिवहन विभागाने ही मुदत १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.यापूर्वी एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यासाठी ३० जूनपर्यंतची मुदत देण्यात आली होती. २० जून रोजी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी एक पत्रक काढत HSRP नंबर प्लेट बसविण्यासाठीची मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून HSRP नंबर प्लेट्स बसवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना अपेक्षेप्रमाणे वेग आलेला नव्हता. कोट्यवधी वाहनांसाठी नंबर प्लेट्सची उपलब्धता, ऑनलाइन बुकिंगमधील तांत्रिक अडचणी, फिटमेंट सेंटरवरील गर्दी आणि ग्रामीण भागातील वाहनधारकांची गैरसोय ही प्रमुख कारणे या मुदतवाढीमागे असल्याचे बोलले जात आहे.

अनेक ठिकाणी नंबर प्लेट्स मिळायला विलंब होत होता, तर काहींना ऑनलाइन अर्ज करण्यात अडचणी येत होत्या. या सर्व बाबी लक्षात घेऊन यापूर्वी सरकारने HSRP नंबरप्लेट बसविण्यासाठीची मुदत वाढवली होती. अजूनही अनेक वाहनांना ही नंबरप्लेट बसवण्यात आलेली नाहीये. या वाहनांना ही नंबरप्लेट बसविता यावी यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परिवहन आयुक्तांनी म्हटले आहे.

परिवहन आयुक्तांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकामध्ये HSRP नंबरप्लेटसाठी देण्यात आलेली मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवत असल्याचे सांगत असतानाच ही अंतिम मुदतवाढ असल्याचे म्हटले आहे. १५ ऑगस्टपर्यंत ही नंबरप्लेट बसवली नाही तर वायु वेग पथकाद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे आयुक्तांनी म्हटले आहे

## संपादकीय ......

# निवडणुकांचे पडघम!

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या हालचालींना आता वेग आला असून त्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभागरचना करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. अ, ब, क वर्ग महानगरपालिकांची प्रभागरचना करण्याबाबतचे आदेश सरकारने दिले आहेत. यात पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, वसई, विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे. राज्यात गत तीन-चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. त्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता त्यासंबंधी हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका होणार आहेत त्या ठिकाणी प्रभागरचनेचे आदेश देण्यात आले आहेत. प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष लावायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार आहेत. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एकसदस्यीय प्रभागरचना असेल. पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत. मुंबईत २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले. महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर पुन्हा २२७ प्रभाग करण्यात आले. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. परंतु आव्हान याचिका फेटाळण्यात आल्याने आता मुंबईमध्ये पुन्हा २२७ प्रभाग असणार आहेत. अ वर्ग महानगरपालिकांत पुणे, नागपूर; ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड ब वर्गात तर क वर्गात नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण डोंबिवली महानगरपालिकांचा समावेश आहे. ड वर्ग महापालिकांमध्ये अमरावती, अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सोलापूर, सांगली-मिरज-कुपवाड, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, जळगाव, नांदेड, धुळे, मालेगाव, लातूर, चंद्रपूर, परभणी, पनवेल, इचलकरंजी आणि जालना या महापालिकांचा समावेश आहे. ड वर्गातील महापालिकेत प्रभागरचना ठरवताना शक्यतो सर्वच प्रभाग चार सदस्यांचे करायचे आहेत.

मात्र, सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा पाच सदस्यांचा होईल अथवा दोन प्रभाग तीन सदस्यांचे होतील. निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार नगरविकास विभागाने महापालिका, नगरपालिका तसेच नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी प्रभागरचना करण्याचे आदेश मंगळवारी जारी केले. राज्यातील ड वर्गातील १९ महापालिकांची प्रभागरचना करण्याचे आदेश जिल्हाधिका-यांना देण्यात आले आहेत. गत तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. आधी कोरोना आणि नंतर न्यायालयात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा लटकल्याने या निवडणुका खोळंबल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्य सरकारने ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये या निवडणुका घेण्याची तयारी सुरू केली. त्यानुसार राज्य सरकारने प्रभागरचनेचे आदेश दिले आहेत.या आदेशांचे पालन करताना नगरविकास विभागाने अ, ब, क वर्ग १० महापालिकांची प्रभागरचना करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिले आहेत, तर ड वर्ग १९ महापालिकांची प्रभागरचना करण्याचे आदेश जिल्हाधिका-यांना दिले आहेत. प्रभागरचनेसाठी साधारणपणे अडीच महिन्यांचा कालावधी लागणार असून त्यासाठी गुगल मॅपचा आधार घेण्यास सांगण्यात आले आहे. प्रभागरचना करताना महापालिका क्षेत्राची माहिती असणारा अधिकारी, प्रभागरचनेशी संबंधित नेमलेला अधिकारी, नगररचनाकार, संगणकतज्ज्ञ यांची महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. महापालिका आयुक्त प्रारूप प्रभागरचना तयार करून राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेस सादर करतील. त्यानंतर राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्रभागरचनेस मान्यता देण्यात येईल. आयोगाने मान्यता दिल्यानंतर प्रभागरचना महापालिका आयुक्तांकडून प्रसिद्ध करण्यात येणार असून त्यावर हरकती सूचना मागविण्यात येतील. यावर सुनावणी घेऊन निवडणूक आयोगाकडून अंतिम प्रभागरचनेस मान्यता देण्यात येईल. प्रारूप प्रभागरचना प्रसिद्ध करेपर्यंत ही प्रभागरचना गुप्त ठेवण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना देण्यात आले आहेत.या सर्व प्रक्रियेला अडीच ते तीन महिन्यांचा कालावधी लागेल. राज्यात एकूण २९ महानगरपालिका, २४८ नगर परिषदा, १४७ नगरपंचायती आहेत. मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एकसदस्यीय प्रभाग राहणार आहेत. नगरपालिका, नगरपंचायतीच्या प्रभागरचनेचे स्वतंत्र आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात महापालिका, नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीचा बार उडेल. सप्टेंबर २०२२ च्या आदेशानुसार शक्यतो सर्व प्रभाग ४ सदस्यांचे असतील मात्र एखादा प्रभाग ३ सदस्यांचा आणि दुसरा ५ सदस्यांचा ठेवण्यास मुभा देण्यात आली आहे. ३-३ सदस्यांचे दोन प्रभाग ठेवण्यासही परवानगी आहे. मात्र, भौगोलिक सलगपणा राखण्याचे आणि नागरिकांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रभागरचनेची प्रक्रिया उत्तर दिशेपासून सुरू होऊन दक्षिण दिशेकडे पूर्ण केली जाईल. प्रभागाच्या सीमारेषा ठरवताना रस्ते, नद्या, रेल्वे लाईन तसेच नैसर्गिक सीमा लक्षात घेतल्या जातील. कोणतीही इमारत दोन प्रभागांमध्ये विभागली जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

# 'स्टॉप डायरिया' अभियानाला अमरावतीत सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती-** ३: राज्यात २ जून ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत 'स्टॉप डायरिया' अभियान राबविण्यात येत असून, या अभियानाचा शुभारंभ जिल्ह्यातील नांदगावपेठ ग्रामपंचायतीमध्ये झाला. या मोहिमेचे अंतिम ध्येय अतिसारामुळे होणारे बालमृत्यू 'शून्यावर' आणणे हे आहे. 'अतिसारावर करा मात, स्वच्छता आणि ओआरएसची घेवूनी साथ' हे या अभियानाचे घोषवाक्य आहे.




अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा राऊत, मंगला मोहोड, विस्तार अधिकारी श्रीमती लकडे ,जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी वनिता शिंदे तसेच आशा सेविका, अंगणवाडी सेविका ,पालकवर्ग, ग्रामसदस्य आणि आरोग्य कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आशा सेविकांनी ओआरएस (जठड) द्रावण कसे बनवायचे आणि हात कसे धुवायचे याचे प्रात्यक्षिक दाखविले, ज्यामुळे उपस्थित लोकांना अतिसार प्रतिबंधाचे सोपे आणि प्रभावी उपाय समजले. डॉ. प्रवीण पारिसे म्हणाले, 'स्टॉप डायरिया' अभियानात आरोग्य विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, पंचायत विभाग, शिक्षण विभाग, पाणी पुरवठा विभाग यांसारखे विविध शासकीय विभाग सहभागी आहेत. ० ते ५ वयोगटातील बालकांच्या एकूण मृत्यूंपैकी ४.८ टक्के मृत्यू हे अतिसारामुळे होतात. अतिसाराची लक्षणे दिसताच, ओआरएस, झिंक गोळ्या किंवा घरगुती पेये वापरून आपण त्यावर सहज उपचार करू शकतो आणि बालमृत्यू रोखू शकतो. अभियानातंर्गत आशा सेविका आणि आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन अतिसाराने ग्रस्त असलेल्या बालकांना ओआरएस आणि झिंक गोळ्यांचे वाटप करतील. गरजेनुसार त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात संदर्भीत केले जाईल. तसेच, लोकांना ओआरएस बनवण्याची आणि हात धुण्याची योग्य पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे शिकविली जाईल.

'स्टॉप डायरिया' अभियान २०२५ जिल्ह्यात दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. टप्पा-१ मध्ये २ ते १५ जून २०२५ या दरम्यान मोहिमेचे नियोजन, विविध विभागांमध्ये समन्वय, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, जिल्हा व तालुका कृती दलाची स्थापना, आयईसी आराखडा निश्चित करणे आणि ओआरएस व झिंक गोळ्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची खात्री करणे या बाबींचा समावेश आहे. टप्पा-२अंतर्गत १६ जून २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत निव्वळ स्तनपानास प्रोत्साहन, रोटा व्हायरस लसीकरण, हातांची स्वच्छता, सुरक्षित पाण्याची व्यवस्था, ओआरएस आणि झिंकचे वितरण, सर्व आरोग्य संस्था आणि अंगणवाड्यांमध्ये ओआरएस-झिंक कॉर्नरची स्थापना आणि अतिसारावरील उपचार यावर भर दिला जाईल.




# मलेरियाचा हृदय आणि रक्तवाहिन्यांवर थेट परिणाम

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

मलेरिया म्हणजे खूप ताप येणे आणि थंडी वाजणे हे सगळ्यांनाच माहित आहे. मात्र, मलेरिया हा केवळ ताप येणारा आजार नसून तो तुमच्या हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवरही परिणाम करू शकतो हेही तितकेच खरे आहे. थंडी वाजणे आणि थकवा जाणवणे तसेच तुमच्या हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधित प्रणालीवर प्रचंड ताण निर्माण होऊ शकतो.या संदर्भात मुंबईतील सर एच. एन. रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथील कार्डियाक सर्जन डॉ. बिपीनचंद्र भामरे, यांनी महत्त्वाची माहिती सांगितली आहे. ते म्हणतात, मलेरिया हा एक गंभीर आजार आहे जो प्रामुख्याने प्लाझमोडियम परजीवींमुळे होतो. तो बहुतेकदा संक्रमित ॲनोफिलीस डास चावल्याने पसरतो. उष्णकटिबंधीय प्रदेशात मलेरिया मोठ्या प्रमाणात पसरण्याची शक्यता असते. मलेरिया असलेल्यांना तीव्र ताप, घाम येणे, थंडी वाजणे, डोकेदुखी, मळमळ आणि पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरही खूप थकवा जाणवणे अशी लक्षणे दिसून येतात.

**हृदयविकाराचा झटक्याची शक्यता** - तुमच्या हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवर मलेरिया सारख्या आजाराने गंभीर परिणाम होऊ शकतो. यामुळे गंभीर गुंतागुंत देखील निर्माण होऊ शकते जे रुग्ण बरे झाल्यानंतरही काही काळ टिकून राहू शकते. यामुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होण्याचा धोका वाढू शकतो. तुमचे रक्त गोठू शकते आणि त्यामुळे धमन्यांमध्ये अडथळा निर्माण होण्याचा धोका वाढतो. यामुळे हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक येऊ शकतो. मलेरियामुळे रक्तवाहिन्यांना सूज येऊ शकते, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी होते. यामुळे रक्त प्रवाह कार्यक्षमतेने होणे



कठीण होऊ शकते.

**लाल रक्तपेशी नष्ट होतायेत?-** गंभीर प्रकरणांमध्ये, मलेरिया लाल रक्तपेशी नष्ट करू शकतो, ज्यामुळे अशक्तपणा येतो. यामुळे तुमचे हृदय शरीरात पुरेसे ऑक्सिजन पुरवण्यासाठी नेहमीपेक्षा जास्त वेगाने रक्त पंप करण्यास भाग पाडते आणि हार्ट फेल्युअरचा धोका वाढतो. मलेरियामुळे तुमच्या रक्तदाबाच्या पातळीत अचानक घट होऊ शकते ज्यामुळे हृदयासह महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा कमी होऊ शकतो. तुमच्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी प्रणालीवर जास्त ताण आल्याने अतालता(अनियमित हृदयाचे ठोके) होऊ शकते, ज्यामुळे धडधडणे, चक्कर येणे किंवा आणखी गंभीर गुंतागुंत होऊ शकते. म्हणूनच तुमच्या आरोग्याला प्राधान्य देणे आणि मलेरियासारखी लक्षणे आढळल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

# फलोत्पादन अभियानात नव्या वनस्पतींचा समावेश; शेतकऱ्यांसाठी संधी वाचा सविस्तर

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक**

शेतकऱ्यांसाठी आता पारंपरिक फळझाडांबरोबरच औषधी व सुगंधी वनस्पतींच्या लागवडीसाठीही सरकारकडून अनुदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत राबवण्यात येणाऱ्या एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमात (चखऊक्र) यांचा नव्याने समावेश करण्यात आला असून, इच्छुक शेतकऱ्यांकडून महाडीबीटी (चकऊइढ) पोर्टलवर अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे.

**कोणकोणत्या औषधी वनस्पतीसाठी अनुदान?**

या योजनेत खालील औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी अनुदान दिले जाते. यात अश्वगंधा, ब्राम्ही, ज्येष्ठमध, मुलेठी, शतावरी, कलिहारी, मंजिष्ठा, गुग्गूळ, कुटकी, जटामासी, विदारीकंद, चिराटा, तुलसी, पिंपळी, अतिस, पुष्करमूळ आदी वनस्पतींचा समावेश करण्यात आला आहे.

**अशी आहे अनुदान रचना?**

औषधी वनस्पती लागवडीचा खर्च १,५०,००० प्रति हेक्टर प्रमाणे मिळतो.

**अनुदान प्रमाण**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी ४० टक्के अर्थसाहाय्य मिळते.

अनुसूचित/जास्त प्रमाणात आदिवासी असलेल्या क्षेत्रासाठी ५० टक्के अर्थसाहाय्य मिळते.

अधिकतम क्षेत्र : २ हेक्टर

**महागड्या सुगंधी वनस्पतीसाठी अनुदान**

शेतकऱ्यांनी बाजारमूल्य जास्त असलेल्या सुगंधी वनस्पतींची व्यावसायिक लागवड केली तरी त्यासाठी अनुदान उपलब्ध आहे.

समाविष्ट सुगंधी वनस्पती गुलाब, जिरेनियम, कॅमोमाइल, निशिगंध, चंदन, दवणा, जाई, रोझमेरी, लॅव्हेंडर आदी सुगंधी वनस्पतींचा समावेश करण्यात आला आहे.

**अनुदान रचना : सुगंधी वनस्पती**

लागवडीचा खर्च मापदंड : १,२५,००० प्रति हेक्टर

**अनुदान प्रमाण**

सर्वसाधारण क्षेत्र : ४० टक्के

अधिसूचित क्षेत्र : ५० टक्के

मर्यादा : जास्तीत जास्त २ हेक्टरपर्यंत अनुदान

**अर्ज प्रक्रिया**

* अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जावे.

* तिथे 'फलोत्पादन घटक' अंतर्गत अनुदानासाठी ऑनलाइन अर्ज सादर करावा.

* लागवडीच्या प्रस्तावाबरोबर संबंधित कागदपत्रे अपलोड करावीत.

अनुदानासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी

* ७/१२ उतारा

* आधार कार्ड

* बँक पासबुकची झेरॉक्स

* जातीचा दाखला (Caste Certificate) (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदींसाठी)

* शेतकरी उत्पादन कार्ड / कृषी कार्ड (ऋाीशी खवशप- ींळषळ उरीव) (जर उपलब्ध असेल तर)

* डिजिटल सायन इन केलेला अर्जाचा प्रिंट

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, औषधी व सुगंधी वनस्पतींमध्ये उत्पन्नासह बाजारात मागणीही प्रचंड आहे. अनुसूचित/जास्त प्रमाणात आदिवासी असलेल्या क्षेत्रासाठी ५० टक्के अर्थसाहाय्य मिळते. या संधीचा उपयोग करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अर्ज करून उत्पादनाच्या नव्या नव्या दिशा स्वीकाराव्यात.

औषधी आणि सुगंधी वनस्पतींची शेती ही उत्पन्नवाढीचा उत्तम पर्याय ठरू शकते. शाश्वत शेती आणि जैविक उत्पादनाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही योजना एक मोठी संधी आहे. सरकारच्या मदतीसह ही शेती आता अधिक फायदेशीर ठरू शकते.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# जिल्ह्यात 'पीएम मित्रा' मेगा टेक्सटाईल पार्कसाठी लवकरच २२० केव्हीचे नविन उपकेंद्र स्थापित होणार

## उपकेंद्रामुळे उद्योगांना अखंड, स्थिर वीज पुरवठा मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती-**

जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीला चालना देण्यासाठी आणि टेक्सटाईल पार्कची वीजेची गरज पूर्ण करण्यासाठी लवकरच २२० केव्ही क्षमता असलेले नवीन अती उच्चदाबाचे स्वतंत्र वीज उपकेंद्र पीएम मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रिजन अँड ॲपेरल 'पीएम मित्रा' पार्क अमरावती येथे स्थापित होणार आहे. २२० केव्ही क्षमता असलेल्या या उपकेंद्राची उभारणी महापारेषण या कंपनीकडून करण्यात येणार आहे. जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात महत्वपूर्ण ठरणाऱ्या या २२० केव्ही उपकेंद्राचा प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी महावितरणकडून महावितरणच्या मुख्य कार्यालयाला पाठविण्यात आला असल्याची माहिती महावितरणचे अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी दिली आहे.जिल्ह्यात आकार घेत असलेल्या 'पीएम मित्रा' मेगा टेक्सटाईल पार्क ला लागणाऱ्या वीजेची गरज भागविण्यासाठी तसेच प्रस्तावित टेक्सटाईल पार्कला अखंड आणि गुणवत्तापूर्ण वीज देण्यासाठी २२०/३३ केव्ही या स्वतंत्र उपकेंद्राची आवश्यकता आहे. उपकेंद्राच्या स्थापनेसाठी आवश्यक असलेली मागणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त झाल्यानंतर, महावितरण कडून विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला असून अंतीम मंजूरीकरीता दिनांक ९ एप्रिल २०२५ ला महावितरणच्या मुख्य कार्यालयाला पाठविण्यात आला.

परंतू त्यानंतर मुख्य कार्यालयाच्या तपासणी दरम्यान अहवाला संदर्भात मागीतलेल्या तांत्रिक सुधारणा तसेच दुरूस्ती पूर्ण करून उपकेंद्र स्थापनेचा विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) परत मंगळवार दिनांक १७ जून रोजी मुख्य कार्यालयाच्या मंजूरी करीता पाठविण्यात आला आहे. प्रस्तावास मंजूरी प्राप्त होताच पीएम मित्रा' मेगा टेक्सटाईल्स पार्क मधील उपकेंद्राच्या उभारणीला महापारेषणकडून सुरूवात होणार आहे.औद्योगिक विकासात वीज हे महत्वाचे घटक आहे. त्यामुळे उद्योगांना ताबडतोब आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी महावितरण कटिबध्द आहे. येथे पुर्णत्वास येत असेल्या 'पीएम मित्रा' मेगा टेक्सटाईल पार्कमधील या २२० केव्हीच्या अतीउच्चदाब उपकेंद्रा मुळे जिल्ह्यातील उद्योगांना अखंड, स्थिर वीज पुरवठा मिळणार असून स्थानिक रोजगार व आर्थिक घडामोडींना मोठी चालना मिळणार आहे. हा निर्णय जिल्ह्यातील औद्योगिक पायाभूत सुविधांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.




आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शुक्रवार दि. २० जून २०२५

शहर/ग्रामिण


# शिस्त, गतिमानता आणि चांगल्या कामगिरीवर भर द्या

## पहिल्याच दिवशी अधिकारी, कर्मचाऱ्यांना काम करण्याच्या दिल्या सूचना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** – सर्वांनी एक नव्या उर्जेने गतीमान काम करणे अपेक्षित आहे. शिस्त, गती आणि चांगली कामगिरी या तीन गोष्टीवर प्रत्येकाने कार्य करावे, कायद्याच्या चाकोरीत राहून नागरीकाच्या समस्या, लोकप्रतिनिधीचे प्रश्न गतीमान पध्दतीने सोडविण्याच्या सुचना मनपा आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांनी दिल्या.

महापालिकेत आयुक्त तथा प्रशासकपदी सौम्या शर्मा (चांडक) गुरुवारी रुजु झाल्या. महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांची भेट घेवून त्यांनी महानगरपालिका आयुक्त या पदाचा पदभार स्विकारला. आयुक्त शर्मा यांनी यावेळी अधिकाऱ्यांचा ओळख परिचय जाणून घेतला. प्रत्येक अधिकाऱ्यांने आपल्या विभागाचेकामकाजाविषयी माहिती दिली. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांनी यावेळी मावळते आयुक्त सचिन कलंत्रे यांना निरोप दिला. सचिन कलंत्रे यांनी यावेळी सर्व सहकाऱ्यांनी सहकार्य केले. अनेककामे मार्गी लागली म्हणूनच अमरावती शहर हे महाराष्ट्रातील चांगल्या शहरात गणले जाते. याठिकाणी काम करताना चांगला अनुभव आल्याचे त्यांनी सांगितले.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा ह्या प्रथम दिल्लीत सेवा, त्यानंतर महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यात देगलूरमध्ये कार्यरत होत्या तसेच जिल्हा परिषद, नागपूर व स्मार्ट सिटी नागपूर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत होत्या.विभागप्रमुखांच्या बैठकीत माजी आयुक्त सचिन कलंत्रे यांनी आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले.

आपला प्रयत्न राहणार असल्याचे महानगरपालिकेच्या नवनियुक्त आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांनी सांगितले आहे. नागरिकांच्या ज्या प्राथमिक गरजा आहे, त्या गरजांची पूर्तता करण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे. है काम करतांना काही निर्णय घ्यावे लागतील, नागरिकांचे समाधान करण्याचा आपचा प्रयत्न राहणार आहे. सर्व अधिकारी, कर्मचारी व अमरावतीकरांचे, सहकार्य आम्हाला गरजेचे आहे आणि ते मिळेल, अशी अपेक्षा आहे. मोठ्या शहरात जे काम सुरु आहे

### महापालिका आयुक्तपदी सौम्या शर्मा (चांडक) रुजू

ते अमरावतीमध्ये करण्याचा प्रयत्न करण्यात येईल आणि दर्जा वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल.

स्वच्छता तसेच महिला सशक्तीकरण या कामांना प्राधान्य देण्यात येईल असेही त्या म्हणाल्या.शहर स्वच्छ आणि सुंदर करण्याकडे महापालिकेचा भर राहील. महानगरपालिकेच्या आर्थिक स्त्रोत बळकट करण्याची ग्वाही आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांनी दिली. यावेळी त्यांनी विविध विषयांवर पत्रकारांशी चर्चा केली. विविध सामाजिक संघटनेनी यावेळी त्यांचे स्वागत केले.

# येवदा सरपंच प्रतिभा माकोडे तिसऱ्यांदा अपात्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०दर्यापूर**– दर्यापूर तालुक्यातील येवदा ग्रामपंचायतीतील राजकीय नाट्याने पुन्हा एकदा जोर धरला आहे. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार, येवदा ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच श्रीमती प्रतिभा माकोडे यांना त्यांच्या पदावरून तिसऱ्यांदा अपात्र घोषित करण्यात आले आहे. प्रदीप वडतकर, येवदा यांनी दाखल केलेल्या अपीलावर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकरणात तक्रारदार प्रदीप वडतकर आणि त्यांचे कायदेशीर सल्लागार अधिवक्ता अरविंद गुळदे यांचा युक्तिवाद महत्त्वाचा ठरला. यामुळे येवदा ग्रामपंचायतीच्या कारभारातील अस्थिरता पुन्हा एकदा समोर आली आहे.

**प्रकरणाची पार्श्वभूमी आणि मुख्य आरोप :** ग्रामसभा बेकायदेशीरपणे तहकूब करणे, दुकान गाळा भाड्याने देण्याबाबत अनियमितता, मालमत्तेच्या हस्तांतरणात नियमांचे उल्लंघन, पाण्याच्या टाकीच्या जागेचा वाद या सर्व आरोपांविरोधात प्रदीप वडतकर यांनी दाखल केलेल्या तक्रारींवरून सरपंच प्रतिभा माकोडे यांना तब्बल तीन वेळा अपात्र होण्याची वेळ आली. सरपंच प्रतिभा राजेंद्र माकोडे यांना विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार प्रथम २२ जानेवारी २०२५ रोजी सरपंच पदावरून अपात्र घोषित करण्यात आले होते. परंतु उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार घ अपात्र घोषित झाल्यापासून त्यांना तीन आठवड्याची मुदतवाढ मिळाली होती. त्यांची ही मुदत १२ फेब्रुवारीला संपल्याने ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमानुल्ला खा दिलावर खा यांना सरपंच पदाचा प्रभार सोपविण्यात आला होता. त्यानंतर दुसऱ्या प्रकरणात २६ जानेवारीची ग्रामसभा न घेण्याच्या प्रदीप वंडतकर यांच्या तक्रारीवरून कर्तव्यात कसुर केल्याचा ठपका ठेवत जिल्हाधिकारी यांनी २४ फेब्रुवारीला सरपंच आणि सदस्य पदावरून दुसऱ्यांदा अपात्र घोषित केले होते. त्यानंतर माकोडे यांनी विभागीय आयुक्तांच्या निर्णयाला मंत्रालयातून ७ मार्च रोजी स्थगिती मिळविली व दुसऱ्या प्रकरणात त्यांना ४ एप्रिल रोजी उच्च न्यायालयातूनयांच्या निर्णयालासुद्धा स्थगिती मिळविली. दोन्ही निलंबनाच्या आदेशाला स्थगिती मिळाल्याने प्रतिभा माकोडे यांनी ७ एप्रिल रोजी दुसऱ्यांदा पदभार सांभाळला. दोन्हीही प्रकरणाबाबत अद्यापही निकाल घोषित झालेला नाही. परंतु तिसऱ्या प्रकरणात अपर आयुक्त, अमरावती विभाग यांनी १६ मे २०२४ रोजी प्रदीप वडतकर यांचा अर्ज अमान्य केला होता. प्रदीप वडतकर यांनी अपर आयुक्त, अमरावती विभाग यांच्या १६ मे २०२४ रोजीच्या आदेशाला आव्हान देत ग्रामविकास मंत्री यांच्या न्यायालयात अपील दाखल केले होते. या अपिलावर १५ एप्रिल २०२५ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी झाली होती. त्यामध्ये ग्रामविकास मंत्र्यांनी, तक्राकर्त्यांचे मुद्दे, लेखी म्हणणे आणि तोंडी युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर, अपर आयुक्त, अमरावती विभाग यांनी पारित केलेल्या १६ मे २०२४ च्या आदेशात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता असल्याचा निष्कर्ष काढला. त्यानुसार, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ३९ (३) नुसार प्राप्त अधिकारान्वये मंत्री (ग्रामविकास) यांनी ९ जून २०२५ रोजी प्रदीप वडतकर यांचे अपील मान्य करुन, अपर आयुक्त, अमरावती विभाग यांचा आदेश रद्द केला व १६ जून रोजी मंत्रालयाचे पत्र प्राप्त होताच दिनांक १७ रोजी परत उपसरपंच अमानुल्ला पठाण यांनी प्रभार सांभाळला आहे.–

# महापालिका निवडणुकीसाठी ३७ गुन्हेगारांवर होणार एमपीडीए दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** : मनपा निवडणूक व धार्मिक सण–उत्सव पाहता पोलीस आयुक्तांनी शहरातील ३७ सराईत गुन्हेगारांची यादी तयार केली आहे. त्यांच्याविरूध्द एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई करण्याची प्रक्रिया आयुक्तालयात युध्दस्तरावर सुरु आहे. शहरात हत्या, हाणामारी, सामूहिक हल्ला, प्राणघातक हल्ले याघटना पाहता पोलीस आयुक्तांनी शहरातील १० पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या सर्व

### शाळा, महाविद्यालयात लागणार तक्रार पेटी

शहरातील शाळा व कॉलेजमध्ये पोलीसामार्फत तक्रार पेट्या लावण्यात आल्या होत्या. परंतु कोरोनानंतर त्यांकडे दुर्लक्ष झाले. महिला व मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून शहरातील प्रत्येक शाळा, कॉलेजमध्ये तक्रार पेट्या लावण्याचा निर्णय घेतला आहे.



प्रकारच्या गुन्हेगारांची माहिती घेतली. त्यांची गुन्हे करायची पध्दत आणि दाखल असलेले गुन्हे पाहता आयुक्तांनी शहरातील३७ सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी संबंधित गुन्हेगारांचीकुंडली काढायला सुरुवात केली आहे. शहरात मनपा निवडणूक आणि धार्मिक सण, उत्सव सुरू होणार आहे. त्यानुषंगाने संबंधित ठाण्यातील अधिकारी प्रस्ताव तयार करीत आहेत.

### अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील धक्कादायक घटना

# शेतकऱ्यांच्या चुकाऱ्याचे ४.८० लाख लंपास

### व्यापाऱ्याची गल्लूयाची पेटी उचलून चोरट्याचे पलायन, अडते व व्यापाऱ्यांच्या सुरक्षीतेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अचलपूर,**– अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरूवारी १९ जूनरोजी दुपारी ३ वा. सुमारास भरदिवसा चोरीची घटना घडली. शेतकऱ्यांच्या चुकाऱ्यासाठी बँकेतून व्यापाऱ्याने काढलेले ४ लाख ८० हजार रुपये असलेली रक्कम अज्ञात चोरट्यांनी लंपास केली आहे.

संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. गुरूवार असल्यामुळे बाजार समितीत शेतकरी आणि व्यापाऱ्यांची वर्दळहोती. नेहमीप्रमाणे बंडु बंसगोपाल अग्रवाल या व्यापाऱ्याने श्री जय अंबे ट्रेडर्स या प्रतिष्ठानात शेतकऱ्यांना चुकारा देण्यासाठी बँकेतून रोकड काढली होती. ही रक्कम लाकडी पेटीत ठेवण्यात आली होती. बंडु अग्रवाल धान्य खरेदीसाठी काही वेळ बाहेर गेल्याने दुकानात कोणीच नव्हत. नेमकी ही बाब हेरुन अज्ञात चोरट्याने पाळत ठेवतती पेटीच पळवली.



**चोरटा सीसीटीव्हीत कैद**

या दरम्यान एक दुचाकी चालक बाहेर लक्ष ठेवून होता. अगदी लहान दिसणाऱ्या या चोरट्याने ही पेटी दुचाकी चालक येताच त्यावर ठेऊन दोघेही रफुचक्करझाले. याचोरीची माहितीहोताचपरतवाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.बाजार समितीतील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, संशयित चोरटा कॅमेऱ्यात कैद झाल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांकडून सदर फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटवण्याचे आणि त्याचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भरदिवसा आणि गर्दीच्या ठिकाणी झालेल्या या चोरीमुळे व्यापाऱ्यांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरटे बाजार समितीच्या अचलपूर गेट मार्गे बाहेर पळाले असतांना बाजार समितीचे कर्मचारी गेटवर तैनात होते. दिवसा ढवळ्या चोरी झाल्याने बाजार समितीच्या आवारात लाखो रूपये घेऊन बसलेल्या अडते व व्यापाऱ्यांच्या सुरक्षीतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# शाळास्तरावर प्रवेशोत्सव साजरा होणार

### विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश, बुट, मोजे मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** –शाळा प्रवेशोत्सव २३ जूनला साजरा करण्यासाठी विविध उपक्रम शाळेत राबविण्यात यावे, असे आदेश जिल्हा परीषद शिक्षण विभागाने शाळांना दिले आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी १०० शाळांना जिल्हातील खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, जि.प. अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी, डायटचे प्राचार्य, सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शाळा प्रवेशोत्सव साजरा होणार आहे. यावेळी मोफत पाठ्यपुस्तक व शालेय गणवेशाचे वितरण केले जाणार आहे.२१ जून शाळेच्या परिसराची



स्वच्छता आणि सुशोभिकरण करणे, वर्ग खोलींची किरकोळ दुरुस्ती करून वर्ग खोलीची स्वच्छता करून घेणे, अध्ययन अध्यापन साहित्य वर्गनिहाय वर्गात लावणे, शालेय पोषण आहार अंतर्गत धान्य व धान्यादी मालाची स्वच्छता करून घेणे, पिण्याच्या पाण्याची टाकी निर्जंतुकीकरण करणे, स्वच्छतागृहाची स्वच्छता करून पाण्याची सुविधा करणे, वृक्षारोपणाची तयारी करून घेणे, सकाळी योगदिन साजरा करणे आर्दीचे मोफत पाठ्यपुस्तके मोफत गणवेश नवागतांचे होईल स्वागत जि.प. शाळेत घेऊया प्रवेग नियोजन शाळेला करावे लागणार आहे.यासह नवगतांच्या स्वागताची पूर्वतयारी करणे, शाळेत नवीन प्रवेशित होणाऱ्या बालकांच्या घरी भेटी देणे, २३ जून रोजी नवीन प्रवेशित बालकांचे औक्षवण करणे व बालकांचे पुष्पगुष्य देवून स्वागत करणे, विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढणे आदी सूचना दिल्या आहेत. सोबतच बैलगाडी किंवा ट्रॅक्टर या साधनांचा वापर करु नये, असेही सूचित केले आहे.

# दोन वर्षीय बालकाला पालकमंत्र्यांची मदत

### साडेतीन लाख रूपयांचे दिले मशिन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**– एकांश या दोन वर्षीय बालकाचे कानातील मशिन बसस्थानकावर अनावधानाने हरवले. त्यामुळे बालकाला ऐकण्याची समस्या झाली. परंतू घरची हालाखीची परिस्थिती असल्याने नवीन मशिन घेणेही शक्य नव्हते. मात्र पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मदतीचा हात देऊन या बालकाला साडेतीन लाख रूपयांचे मशिन उपलब्ध करून दिले. कर्णबधिर एकांशवर मोफत कॉकलिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेजमध्ये झाली. गेल्या दोन महिन्यांपासून बाळाचा भाषा आणि वाचा विकास होण्यासाठी स्पीच थेरपी दिली जात आहे. स्पीच थेरपीसाठी 'साउंड प्रोसेसर' आवश्यक आहे. सदर साऊंड प्रोसेसर पालकांनी विकतही घेतले होते. मात्र उपचारासाठी अमरावती येथे आले असताना बसस्थानकावर मशिन अनावधानाने हरविले. वडील स्वप्नील खडसे यांनी आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने साउंड प्रोसेसर खरेदी करणे शक्य नसल्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे मदती विनंती केली. स्पीच थेरणीसाठी साउंड प्रोसेसर अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी श्री. खडसे यांनी जिल्हा नियोजन निधीतूनही मदत करण्याची विनंती केली. मुलाचे आयुष्य वाचवण्यासाठी आणि त्याला सर्वसामान्य जीवन जगता यावे, यासाठी साउंड प्रोसेसर लावणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने जिल्हा प्रशासनाने या प्रकरणी मदत करावी अशी विनंती केली. बसस्थानकावर कानातील




मशीन हरवल्यामुळे मागील सहा महिन्यापासून दोन वर्षीय बालक ऐकू, बोलू शकत नव्हता. त्यातच घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे नवीन यंत्रसुद्धा घेण्याची स्थिती नव्हती. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे याबाबत माहिती आल्यानंतर त्यांनी तातडीने दखल घेत मुख्यमंत्री सहायता निधीला पत्र देऊन एकांतला त्वरीत साडेतीन लाख रूपयांची मशीन उपलब्ध करण्याची विनंती केली. मात्र ही मशीन राज्याच्या कोणत्याच योजनेत येत नसल्यामुळे विशेष बाब म्हणून प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला. जिल्हा परिषद आणि पालकमंत्री कार्यालयाच्या पाठपुरावाने एकांशला कर्ण यंत्र मिळाले. त्यामुळे दोन वर्षीय बालकाला आता ऐकता आणि बोलता सुद्धा येणार आहे.

# हरिसाल भागात अनेकांना दर्शन,वाघ-वाघिणीचा रात्री रोडवर इव्हिनिंग वॉक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०धारणी**–मन्ना जावरकरला वाघीणने खाल्लूयानंतर सुध्दा गुगामल वन्यजीव विभागाचे डोळे उघडलेले नाही. आत्तापर्यंत १० जनावरे व एका माणसाची शिकार करणाऱ्या वाघिणीला जीपीएस लागलेले असताना सुध्दा हरीसाल व्याघ्रचे कर्मचारी फक्त आदिवासींना जंगलात प्रवेश करू नये, हेच सांगत सुटले आहे. मात्र, उपाय–योजना शून्य आहेत. दोन दिवसात चिखली फाटा तथा चौराकुंड व रोराच्या जंगलात एक धिप्पाड वाघ व वाघिणीला त्यांच्या पिल्लांसह नागरिकांनी पाहिले असे तरी व्याघ्र प्रकल्प आता पुन्हा मानवी शिकाराच्या प्रतिक्षेत आहे.

पंधरा दिवसांपूर्वी हरिसाल गावालगतच्या ओकर जंगलात लाकुडफाटा आणण्यासाठी गेलेल्या ५५ वर्षीय मन्ना जावरकरला वाघिणीने खाऊन ठाकर केले होते. आ. केवलराम काळे यांच्या हस्ते व रेंजर राहुल घाईत यांच्या उपस्थितीत ५ लाख रूपये नुकसान भरपाई देण्यात आली. मात्र, वाघिणीवर नियंत्रण किंवा तिला त्याच्या सुरक्षित अधिवासाकडे पोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेले नाही. परिणामी हरिसाल ते चौराकुंड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यावर वाहतुक करणाऱ्यांचे जीवन धोक्यात आलेले आहे. माहितीप्रमाणे, हरिसाल, पोटीलावा, बोरी, चौराकुंड, तांगडा, मालुरवन, खोकमार,



चौपन, रोरा, केसरपुर, भिरोजा, केली, कोलकासला धोका होऊ शकतो. मन्नाचा शिकार तीन पिल्ले असलेल्या वाघिणीने केल्यानंतर आता वाघोबा पण स्वच्छंदपणे जंगलात फिरतांना व सडक क्रॉस करतानादिसलेला आहे. कॉल आयडी असूनही वाघाचे लोकेशनव्याघ्रप्रकल्पास मिळत नाही. पण, मेळघाट वासियांना दर्शन होत आहे. अनेक युवकांनी उभे राहून व्हिडीओ पण काढले, फोटो घेतले. मात्र, जंगलात व्याघ्रचे कर्मचारी फिरताना दिसत नाही. शिकार झाल्यावर कायद्याचा धाक दाखवून आदिवासींच्या मनात भिती निर्माण करण्याचे प्रयत्न होत असतात.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात ५२ वर्ष पूर्ण झालेली आहे. मात्र, वाघांची संख्या त्या मानाने वाढलेली नाही. प्रकल्पापूर्वी वाघांची जी संख्या होती तेवढेच जवळपास सध्या वाघ असल्याने प्रकल्पाचे फलित काय, असा प्रश्न निर्माण होत आहे. इंग्रज काळापासून वसलेल्या जंगलातील गावापासून तेव्हा वन्यजीवाला धोका नव्हता, मग, आता घेका कसा, हे अनाकलीय आहे. जंगलातील अवैध वृक्ष कटाई वाढलेले आहे. तर वन विभाग व व्याघ्र प्रकल्पाकडून हजारो हेक्टर रोपवन करण्यात येत असते. मात्र, जंगल वाढलेले नाही, हा कोणाचा दोष आहे. याचे उत्तर शासनाने देण्याची गरज आहे. वन्यजीवाला डिस्टर्ब होतो म्हणून दर दोन तासाने वाहतुक सोडण्यात येत असते. मात्र, वन्यजीवाला हे माहिती नाही, हे पण टायगर प्रोजेक्टला आजपर्यंत समजलेले नाही. आपल्या प्राकृतीक अधिवासाला सोडून वाघ वाघिण मानवी वस्तींच्या दिशेने का येत आहेत, हा एक शोधाचा विषय आहे. सध्या हरिसाल भागात दहशत पसरलेली आहे.

# एपीएमसीचे माजी संचालक गोपाल राणे यांची आत्महत्या

## शेतावर अतिक्रमण करून चौघांनी मानसिक त्रास दिल्याचा चिठ्ठीत उल्लेख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा शिवसहकार सेनेचे जिल्हाध्यक्ष गोपाल बाबासाहेब राणे (५५) यांनी त्यांच्या राठीनगर येथील निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी घडली. राणे यांच्या एका शेतावर अतिक्रमण करण्यात आले असून, त्याच वादातून चौघे जण आपल्याला मानसिक त्रास देत असून जीवे मारण्याची धमकी देत आहे, यातूनच आत्महत्या करत असल्याचे गोपाल राणे यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत नमुद केले आहे. तसेच न्याय देवतेवर विश्वास असून मला न्याय मिळेलच, असाही उल्लेख त्यांनी चिठ्ठीत केला आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांत गुरुवारी उशिरा रात्री गुन्हा दाखल करण्यात आला.

चांदूर बाजार तालुक्यातील देवरी येथील मूळ रहिवासी गोपाल राणे हे अमरावतीमधील राठीनगर भागात कुटुंबीयांसह वास्तव्याला होते. गुरुवारी ते त्यांच्या पत्नीसह मॉर्निंग वॉकला गेले होते. परत आल्यानंतर मी मागील खोलीत लिहीत बसतो, असे पत्नीला म्हणाले. त्यांना कविता, विविध विषयावर लेखन करण्याचा छंद होता. त्यामुळे पत्नीला वाटले ते खोलीत बसून लिखाण करत आहे. मात्र बराच वेळ होऊनही ते खोली बाहेर आले नाहीत. त्यामुळे पत्नीने त्यांना आवाज दिला. मात्र, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. खोलीचे दारही आतून बंद होते. त्यामुळे



गोपाल राणे यांच्या पत्नीने घरातच पहिल्या माळयावर झोपलेल्या मुलाला आवाज दिला. मुलगा ओमप्रकाशने दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यावेळी गोपाल राणे गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. या घटनेची माहिती कुटुंबीयांनी गाडगेनगर पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून पंचनामा केला. त्यावेळी तेथे एक चिठ्ठी आढळून आली. पोलिसांनी ती जप्त केली. या चिठ्ठीत त्यांनी मानसिक त्रास व धमकी देणाऱ्या चार जणांची नावे लिहिली आहेत. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाइकांच्या स्वाधीन करण्यात आला. दरम्यान गुरुवारी रात्री गोपाल राणे यांचा मुलगा ओमप्रकाश राणे (२३) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली होती.

### फाजलापूरच्या शेतीत अतिक्रमण

गोपाल राणे यांचे फाजलापूर शिवारात असलेल्या एका शेतावर अतिक्रमण करण्यात आले आहे. त्या वादातून मला मानसिक त्रास देण्यात येत आहे. शिवीगाळही करण्यात आली आहे. तसेच मारण्याची धमकी देत आहेत. याचवेळी आपल्या आत्महत्येला चार व्यक्ती जबाबदार असल्याचे त्यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत नमुद केले आहे.

---

# वाशिम शहरात तुफान राडा!

## तलवारी-रॉडसह दोन गट आमनेसामने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०वाशीम–** वाशिम शहराच्या व्यवहारे गल्लीत दोन गटांमध्ये तुफान दगडफेक झाल्याची घटना समोर आली आहे.रात्री साडे नऊ वाजेच्या सुमारास तलवारी, लोखंडी रॉड ,पाईप हातात घेऊन भर वस्तीत धुडगूस घालत आक्रमक होत दोन्ही बाजूने तुफान दगडफेक करत धुडगूस घालण्याचा प्रयत्न दोन्ही गटांनी केला आहे.

या घटनेमध्ये दोन वाहनांची तोडफोड करण्यात आली आहे, रात्री साडेनऊच्या दरम्यान दोन्ही गट आमने–सामने आले आणि हातात शस्त्र घेऊन रस्त्यावर उतरले दरम्यान या दोन्ही गटामध्ये नेमका काय आणि कश्यावरून वाद निर्माण झाला हे मात्र,कळू शकले नाही. या घटनेमुळं या भागात नागरिक चांगलेच दहशतीमध्ये होते.परिसरात भीतीच वातावरण वातावरण पसरल होत. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, दोन्ही गटांतील धुडगूस घालणाऱ्यांचा शोध घेत आहेत.

घटनेची माहिती मिळताच वाशिम शहर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.



मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. परिसरात शुकशुकाट असून, पोलिसांनी गस्ती वाढवली आहे. या घटनेप्रकरणी पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, या प्रकरणात सहभागी असलेल्या दोन्ही गटांतील व्यक्तींना ओळखण्याचा प्रयत्न सुरू आहे.या घटनेवर स्थानिक राजकीय नेत्यांनीही प्रतिक्रिया दिल्या असून, शहरात वारंवार अशा प्रकारच्या घटना घडत असल्यामुळे कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त केली आहे. नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस प्रशासनावर असून, दोषींना तत्काळ अटक झालीच पाहिजे, असं अनेक नागरिकांनी म्हटलं आहे.

---

पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात

# ९६ सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांची विविध पदांवर प्राथमिक निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने नुकताच जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा (प्लेसमेंट ड्राईव्ह २) संपन्न झाला. या रोजगार मेळाव्यामध्ये उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ऑनलाइन तसेच ऑफलाईन १९० उमेदवारांनी सहभाग नोंदवून त्यापैकी १४० उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन मुलाखती दिल्या. मुलाखती दिलेल्या उमेदवारांपैकी ९६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. रिम्सचे प्रतिनिधी स्नेहा मुने, टाईम्स ग्रुपचे दिपंशु कोतांगले, एम. के किचन वेअरचे ललित डोले, प्लास्ती सर्जचे सयुजा काळे व जना फायनान्सचे अमोल भूजांडे, जाधव ग्रुप ऑफ कंपनीजचे चंद्रकांत वाघमारे उद्योजक म्हणून उपस्थित होते. मेळाव्यामध्ये सर्व खाजगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.

---

# अमरावतीच्या बाजारात जांभळाची मोठी आवक

## खरेदीसाठी गर्दी: जांभळाच्या औषधी गुणधर्मामुळे बाजारात मोठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–**

उन्हाळा सुरू झाला की बाजारपेठांमध्ये विविध रानमेव्यांची रेलचेल पाहायला मिळते. त्यात जांभळाचा गोड-तुरट स्वाद असलेला रानमेवा विशेष आकर्षण ठरतो. सध्या सध्या अमरावती च्या बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी जांभळाची मोठ्या प्रमाणात आवक होत असून ग्राहकांची खरेदीसाठी गर्दी होत आहे. जांभूळ हे उष्णतेत थंडावा देणारे फळ मानले जाते. गोडसर आणि तुरट चव, जांभळट रंग व औषधी गुणधर्म यामुळे जांभळास बाजारात मोठी मागणी आहे. यावर्षी हंगामाच्या प्रारंभीपासूनच जांभळाला ग्राहकांची चांगली मागणी आहे. मात्र, काही आठवड्यांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे जांभळाच्या उत्पादनावर थोडासा परिणाम झाला आहे. तरीही सध्या बाजारात स्थानिक जांभळांची आवक सुरू झाली आहे. हंगाम बहरत असल्यामुळे येत्या काही दिवसांत आंध्र प्रदेश आणि इतर परराज्यांमधूनही



मोठ्या प्रमाणात जांभळे वाशीम बाजारात दाखल होणार आहेत.

परिणामी, दरात थोडीशी घट होण्याची शक्यता आहे. जांभळाचा हंगाम साधारण अडीच महिने सुरू राहतो. त्यामुळे पुढील काही काळ बाजारात जांभळाची चव चाखणाऱ्या ग्राहकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान जो रानमेवा ज्या मोसमामध्ये मिळतो, तो आरोग्यासाठी खूप फोयदेशीर असतो. त्यामुळे शरीरातील रोगप्रतिकार शक्ती चांगली राहते. वारंवार आजारी असणाऱ्यांसाठी मोसमी फळे, रानमेवा खाणे आवश्यक आहे. मोसमी येणारी फळामध्ये सध्या जांभळाची बाजारात मोठ्या प्रमाणात आवज सुरु आहे. यासाठी नागरिकांनीही खरेदीसाठी बाजारात, मुख्य रस्त्यावर गर्दी दिसून येत आहे.

जांभळाचे सेवन आरोग्यदायी मधुमेह नियंत्रण, पचन सुधारणा यामुळेही जांभळाला मागणी आहे. परिणामी, जांभूळ विक्रीचा हंगाम यंदा चांगला असल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

---


# वन अधिकाऱ्यांच्या बदल्यांमधील 'घोडेबाजार' थांबवा

## , वन्यजीव प्रेमींचे मुख्यमंत्र्यांना साकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

वन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर घोळ निर्माण झाला असून घोडेबाजार देखील सुरू झाला आहे, त्यामुळे हे गैरप्रकार त्वरित थांबवावेत, अशी मागणी येथील वाईल्ड लाईफ अवेअरनेस रिसर्च अँड रेस्क्यू वेलफेअर सोसायटी (वॉर) या संघटनेचे अध्यक्ष नीलेश कंचनपुरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मागील आठवड्यामध्ये



वन विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या व पदस्थापनेचे आदेश वन विभागामार्फत काढण्यात आलेले आहेत. या आदेशामध्ये मोठ्या प्रमाणात घोळ असून ज्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णयानुसार सामाजिक वनीकरण व वन्यजीव विभागात सेवा बजावलेली असतानाही त्यांना प्रादेशिक विभागात जागा रिक्त असतानाही पदस्थापना देण्यात आलेली नाही. शासन निर्णयास डावलून आर्थिक व्यवहारानंतर मोठ्या प्रमाणात बदल्या झाल्याची बाब खाजगीत अनेक अधिकारी बोलून दाखवत आहेत. सद्यस्थितीत वन विभागात नव्याने भारतीय वन सेवेत समाविष्ट झालेले २७ उपवन संरक्षक दर्जाचे अधिकारी व तीन वर्षे सेवाकाळ पूर्ण झालेले उपवनसंरक्षक, वनसंरक्षक, मुख्य वनसंरक्षक व अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक या सवर्गातील सुमारे ५५ ते ६० अधिकारी बदली आदेशाच्या प्रतीक्षाधीन आहेत.सद्यस्थितीत सदर अधिकाऱ्यांनी बदली प्रक्रियेसाठी मंत्रालयांमध्ये आपल्या मध्यस्थ मार्फत मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल करून बदली व पदस्थापनेसाठी मोठ्या प्रमाणात घोडेबाजार सुरु केल्याचे ऐकण्यात येत आहे. मागील काही कालावधीमध्ये वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी ३५ ते ५० लक्ष रुपये द्यावे लागत असल्याची बाब 'ऑडिओ क्लिप' मार्फत प्रसारमाध्यमावर प्रसिद्ध झालेली होती. वनमंत्र्यांच्या निकटचे काही जण त्यांच्या खास दुतामार्फत व स्वतःही संबंधित बदलीपात्र अधिकाऱ्यांच्या संपर्कात असून प्रादेशिक विभागातील पदस्थापनेसाठी मोठ्या रकमेच्या बोली लावण्यात येत असल्याचे चित्र दिसत आहे.

---

# अमरावती विभागात 'जिवंत सातबारा' मोहिमेला यश

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्णयाचे सर्वत्र कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–** महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरू केलेल्या 'जिवंत सातबारा' मोहिमेला अमरावती विभागात चांगला प्रतिसाद मिळाला असून, यामुळे मृत खातेदारांच्या वारसांना मोठा दिलासा मिळाला आहे. वारसांची नोंद शेतजमिनीच्या कागदपत्रांमध्ये, विशेषतः सातबारा उताऱ्यावर, वेळेत न झाल्यामुळे येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी ही मोहीम अत्यंत प्रभावी ठरली आहे. या यशस्वी उपक्रमाबद्दल सामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांनी पालकमंत्री महोदयांचे आभार मानले आहेत. मृत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनीच्या संदर्भात दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांमध्ये वारसांची नोंद विहित मुदतीत अधिकार अभिलेखात न झाल्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन श्री. बावनकुळे यांनी संपूर्ण राज्यात 'जिवंत सातबारा' मोहीम राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. गावातील सर्व मृत खातेदारांच्या वारसांच्या सातबारातील नोंदीची प्रक्रिया पूर्ण



करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. अमरावती विभागात '१०० दिवस कृती आराखडा' कार्यक्रमांतर्गत ही मोहीम अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात आली. प्राप्त आकडेवारीनुसार, अमरावती विभागातील ५६ तालुक्यांमध्ये एकूण ३२ हजार १९५ खातेदार मृत असल्याचे निदर्शनास आले. यापैकी तब्बल १९ हजार १५० वारसांच्या नावे यशस्वीपणे नोंद घेण्यात आली आहे.

अमरावती विभागातील ५६ तालुक्यांमध्ये एकूण ३२ हजार १९५ मृत खातेदार आढळले. २० हजार ५०२ वारस नोंदीसाठी अर्ज दाखल झाले, तर २० हजार ३०१ प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला. एकूण २० हजार १९२ फेरफार दाखल झाले, त्यापैकी १९,१५० फेरफार मंजूर झाले, तर केवळ १४३ फेरफार नामंजूर झाले आहेत. 'जिवंत सातबारा' मोहिमेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या कागदपत्रांबाबत समस्या दूर होण्यास मदत होत आहे.

---

# अमित उपाध्याय हत्याकांडातील सर्व आरोपींची निर्दोष सुटका

## चांदूररेल्वेच्या सातेफळ येथील प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०चांदुर रेल्वे–** अमित उपाध्याय हत्याकांडमधील सर्व आरोपींची जिल्हा व सत्र न्यायाधिश (क्र.३) हिं. ल. मनवर यांनी निर्दोष सुटका केली. शंकर मारोती नेवारे, पीयूष शंकर नेवारे, गौरव शंकर नेवारे (सर्व रा. सातेफळ ता. चांदूररेल्वे) अशी निदर्दोष सुटका झालेल्यांची नावे आहेत. तर अमित उपाध्याय असे मृताचे नाव आहे.अमित उपाध्याय याचे शंकर नेवारेच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध होते आणि ती अमितसोबत राहत होती. त्यामुळे सर्व आरोपींनी २० डिसेंबर २०२२ च्या रात्रीला अमितच्या डोक्यावर सिमेंटची फाडी टाकून त्याची हत्या केली,



अशी तक्रार अमितच्या आईने दिली होती. त्या आधारावर चांदूररेल्वे पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल किला होता. तपासादरम्यान पोलिसांमीघटनास्थळाजवळ राहणाऱ्या लोकांचे व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे बयाण नोंदविले होते.

अॅड. अनिल विश्वकर्मा यांनी बचाव पक्षाची बाजू मांडताना न्यायालयासमोर आरोपी हा व्यसनी होता व त्याचे गावात इतर लोकांशी भांडण होते. तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे नोंदविलेले बयाण व साक्षीदारांचे १६४ प्रमाणे घेतलेल्या बयाणामध्ये तफावत आहे. तसेच फिर्यादी यांनी दिलेली तक्रार खोट्या स्वरुपाची आहे, असा युक्तीवाद केला. न्यायालयाने दोन्ही पक्षाची बाजू ऐकून घेतल्यानंतर सबळ पुराव्याअभावी आरोपींची निर्दोष सुटका केली. याप्रकरणात आरोपींच्या वतीने अॅड. अनिल विश्वकर्मा यांनी बाजू मांडली. तसेच त्यांना अॅड. नम्रता साहू, अॅड. ऋतुराज भोरे, अॅड. मनोज नरवाडे यांनी सहकार्य केले.

---

# शिंदे शिवसेनेत १५ माजी नगरसेवक, सरपंच, उपसरपंच यांचा पक्ष प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०चंद्रपूर :-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात पक्षफोडी आणि पक्षप्रवेशांचे आयोजन मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहेत. काँग्रेस खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या गृह विधानसभा मतदार संघातील भद्रावती आणि वरोरा नगर पालिकेतील शिवसेनेच्या (उबाठा) गटाच्या १५ माजी नगरसेवकांनी शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला. हे सर्व नगरसेवक लोकसभा निवडणुकीत काँग्रेस खासदार धानोरकर यांच्या प्रचारात सहभागी होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीतही ते अपक्ष उमेदवारांच्या पाठीशी उभे राहिले. या पक्षप्रवेशामुळे या दोन्ही नगर पालिकांमधे काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे गट) जबर धक्का बसला आहे.भद्रावती नगरपालिकेवर २०२३ पासून प्रशासक आहे. २७ सदस्यीय



या पालिकेत तब्बल १७ नगरसेवक शिवसेनेचे होते. मागील पंधरा वर्षांपासून दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांचे भाऊ माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली या पालिकेवर शिवसेनेची एकहाती सत्ता होती. दरम्यान, शिवसेनेचे आमदार बाळू धानोरकर यांनी २०१९ मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि लोकसभा निवडणूक लढवली. तेव्हा हे सर्व नगरसेवक आणि तत्कालीन नगराध्यक्ष अनिल धानोरकर काँग्रेसच्या प्रचारात उघडपणे उतरले. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा धानोरकर यांचाही झेंडा त्यांनी हाती घेतला. विशेष म्हणजे, माजी मंत्री संजय देवतळे यांना शिवसेनेने उमेदवारी दिली होती, तरीही हे नगरसेवक काँग्रेसच्या प्रचारात दिसले. दरम्यान, राज्यात महायुतीचे सरकार आले आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. मात्र, अनिल धानोरकरांसह हे नगरसेवक काँग्रेसच्या मंचावर वावरताना दिसत होते.

# औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी सुविधा उभारा- आयुक्त श्वेता सिंघल

## विभागस्तरीय उद्योग समन्वय समितीच्या सभेत देण्यात आले निर्देश

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२०अमरावती**

औद्योगिक क्षेत्राचा विकास अधिक जलद गतीने घडवून आणण्यासाठी त्याठिकाणी पायाभूत सुविधांचे सक्षम जाळे उभे करणे आवश्यक असते. अमरावती विभागातील सर्व एमआयडीसी, औद्योगिक क्षेत्रात नवीन उद्योग-व्यवसाय सुरु होण्यासाठी तसेच भरीव गुंतवणुकीस प्रोत्साहन मिळण्यासाठी औद्योगिक क्षेत्राच्या ठिकाणी अखंडीत वीज पुरवठा, पाणी, रस्ते, स्ट्रीट लाईटस्, रुग्णालय व पोलीस चौकी अशा पायाभूत सुविधा प्राधान्याने उभारण्यात याव्यात, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी मंगळवार, १७ जून रोजी दिले.



येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली विभागस्तरीय समन्वय समितीची सभा (डिएलसीसी) आज झाली. त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अमरावती विभागाचे उद्योग सहसंचालक निलेश निकम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उपरचनाकार स्नेहा नंद यांच्यासह एमआयडीसी व उद्योग विभागाचे अधिकारी, ऊर्जा, पोलिस विभागाचे अधिकारी तसेच इंडस्ट्रीयल असोशिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर, पाचही जिल्ह्यांचे इंडस्ट्रीयल असोशिएशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी पाचही जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील सुरू असलेल्या उद्योग-व्यवसायाबाबत तसेच उद्योजकांच्या अडचणी व समस्यांबाबत सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक जिल्ह्यात मोठ्या, लघू व सुक्ष्म उद्योजकांना नवीन उद्योग उभारणीसाठी व उद्योग-व्यवसायाकरिता गुंतवणूक वाढविण्यासाठी सहाय्य करणे शासनाचे धोरण आहे. याअंतर्गत औद्योगिक क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने त्याठिकाणी प्रामुख्याने वीज, पाणी, रस्ते यासारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील कार्यान्वित असलेल्या उद्योग-व्यवसायांना अखंडीत वीज पुरवठा उपलब्ध व्हावा, यासाठी ऊर्जा विभागाने त्या परिसरात मागणीनुसार विद्युत सबस्टेशन उभारण्यासाठी प्रयत्न करावेत. सर्वच प्रकारच्या उद्योगांसाठी पाणी ही महत्वाची बाब आहे, त्याची पूर्तता करण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने तसेच एमआयडीसी प्रशासनाने समन्वयाने नियोजन करावे, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी केल्या.

उपस्थितांना सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती निर्यात धोरण २०२३, लॉजिस्टीक धोरण-२०२३, अमरावती औद्योगिक क्षेत्रातून होणाऱ्या निर्यातीबाबतच्या ठळक बाबी, निर्यात अनुकूल औद्योगिक विकास कार्यक्रम, निर्यातीसाठीचे प्रमुख उद्योग क्षेत्र, महाराष्ट्र लॉजिस्टीक पॉलीसी, गुंववणूकीसाठीचे प्रमुख व्यवसाय-उद्योग, उद्योग उभारणीसाठी शासकीय योजना, अनुदान योजना आदी संदर्भात उद्योग सहसंचालक निकम यांनी उपस्थित उद्योजकांना सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली. नंद यांनी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारितील औद्योगिक क्षेत्र, भूखंड वितरण प्रक्रिया, कार्यान्वित उद्योगव्यवसाय, कारखाने, महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या विविध योजना व सुविधा, उद्योगासाठी लागणाऱ्या विविध अनुज्ञप्त्या तसेच प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रांचा विकास आदी संदर्भात बैठकीत सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली.

# मोर्शीच्या आठवडी बाजारातील अस्वच्छतेमुळे आरोग्याचा प्रश्न

## तोडगा काढण्यासाठी नागरिकांची जिल्हाधिकाऱ्यांना तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मोर्शी**

येथील आठवडी बाजारातील मटन मार्केटमुळे संपूर्ण परिसरात घाण व दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. याबाबत अनेक वेळा तक्रारी व आंदोलने करूनही प्रशासनाला जाग येत नसल्याने परिसरातील नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी बुधवारी या भागाचा दौरा केला असता नागरिकांनी त्यांच्या समोर हा मुद्दा मांडून निवेदन देत तत्काळ तोडगा काढण्याची मागणी केली. तोडगा न काढल्यास या परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मोर्शीच्या आठवडी बाजारातील मटन मार्केटने बाजार परिसरातील जवळपास ३० टक्के परिसर व्यापला आहे. येथील नगर परिषदेने त्या व्यावसायिकांना ओटे बांधून दिले आहेत. परंतु मटन मार्केटच्या इमारतीमध्ये बसून व्यवसाय करायला कोणीही तयार नाही. आठवडी बाजारातील रिकाम्या जागेत उघड्यावर चिकन-मटनची दुकाने थाटलेली असतात. मोर्शीत मंगळवारी आठवडी बाजार भरतो. त्यामुळे व्यावसायिक आणि बाजाराला येणाऱ्या नागरिकांची कुचंबणा होते. सध्या या संपूर्ण



परिसरात मृत जनावरांचे अवशेष उघड्यावर पडलेले असून, या भागात कुत्र्यांचा मुक्त संचार दिवस-रात्र सुरू असतो. त्यामुळे संपूर्ण परिसर अस्वच्छ झाला आहे.

परिसरात दुर्गंधी पसरलेली असल्याने त्याचा त्रास येथील रहिवाशांना सहन करावा लागतो. ही बाब नित्याचीच झाल्याने नागरिकांनी नगरपालिका प्रशासनाशी पत्रव्यवहारही केला. परंतु वारंवार मागणी करूनही नगरपालिका प्रशासनाने कोणतीही उपाययोजना केली नाही. आठवडी बाजाराच्या दिवशी याच परिसरात भाजीपाला, फळे व खाद्यपदार्थांची दुकाने लागतात. स्वाभाविकच त्या भागातील घाणीमुळे वातावरण प्रदूषित होत आहे. भविष्यात त्यामुळे मोठी रोगराईही निर्माण होऊ शकते, हेही स्थानिकांनी नगरपालिका प्रशासनाच्या लक्षात आणून दिले. परंतु अद्याप कोणतेही पाऊल उचलेले गेले नाही. नगर पालिकेच्या माजी पदाधिकाऱ्यांनी सुद्धा याबाबत प्रशासनाकडे तक्रार नोंदवली. मात्र त्याचाही फारसा परिणाम झाला नाही.

आठवडी बाजारातून जाणारा मुख्य रस्ता पेठपुरा परिसराला जोडला जातो. या रस्त्याने महिला आणि विद्यार्थी यांचीही ये-जा असते. या सगळ्या बाबी लक्षात घेऊन प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी वारंवार करण्यात आली. विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनीही बाजारातील अस्वच्छतेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना लक्ष घालायला सांगितले. परंतु तरीही प्रश्न कायमच आहे. तर दुसरीकडे थेट जिल्ह्याचे प्रशासकीय प्रमुख जिल्हाधिकारी यांच्याकडेच तक्रार नोंदवण्यात आल्याने येत्या काळात काही उपाययोजना होईल, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# एडीसीसी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांची अपात्रता

## प्रतिपक्षाने मागितला दोन दिवसांचा वेळ उच्च न्यायालयात याचिकेची सुनावणी २४ जूनला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे (एडीसीसी) अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांच्या संचालक आणि अध्यक्षपदाच्या अपात्रेबाबतच्या याचिकेची सुनावणी आता मंगळवार, २४ जून रोजी होणार आहे. या प्रकरणातील प्रतिपक्षाने आपली बाजू मांडण्यासाठी दोन दिवसांचा वेळ मागितल्यामुळे मंगळवारी नेमके काय होणार, याकडे सहकार विभागाचे लक्ष लागले आहे.



एडीसीसीचे संचालक हरिभाऊ मोहोड व इतर ११ संचालकांनी बच्चू कडू हे संचालक व अध्यक्षपदासाठी पात्र ठरत नसल्याची तक्रार विभागीय सहनिबंधक यांच्याकडे केली होती. कडू यांना नाशिकच्या न्यायालयाने एका प्रकरणात दोषी ठरवून एक वर्षाची शिक्षा ठोठावली आहे. सन २०१७ सालचे हे प्रकरण आहे. त्यामुळे बँकेच्या उपविधीनुसार ते संचालक आणि पर्यायाने अध्यक्षपदासाठी अपात्र ठरतात, असा तक्रारकर्त्यांचा युक्तीवाद होता. ही बाब ग्राह्य धरुन विभागीय सहनिबंधक यांच्या न्यायालयाने बच्चू कडू यांना दोन्ही पदांसाठी अपात्र ठरविले. अपात्रतेबाबतचा हा निर्णय गेल्या सोमवारी सार्वजनिकरीत्या समोर आला.

त्यानंतर लगेच दुसऱ्याच दिवशी बच्चू कडू यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली. विभागीय सहनिबंधकांच्या निर्णयाला या याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. न्यायमूर्ती पानसरे यांच्या एकलपीठासमोर आज, गुरुवारी या याचिकेची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान प्रतिपक्षाने दोन दिवसांचा अवधी मागितला. मुळात या प्रकरणात प्रतिपक्षानेही मंगळवारीच 'कॅव्हेट' दाखल केलेला असल्याने न्यायमूर्तींनी अवधी मागण्याचा त्यांचा मुद्दा ग्राह्य धरत पुढील सुनावणी २४ जून रोजी निश्चित केली. बच्चू कडू यांच्या वतीने या प्रकरणात ड. पराग कडू युक्तीवाद करणार आहेत. तर प्रतिपक्षाची बाजू मांडण्याचे काम ड. निलेश गावंडे करीत आहेत.

# जिल्हातील १०० शाळेला पदाधिकारी, अधिकारी यांची भेट

## विद्यार्थ्यांना पहील्या दिवशी पाठ्यपुस्तके, गणवेश व बुट-मोजे मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार २००९ नुसार प्रत्येक बालकाचे नाव पटावर नोंदले जाणे आवशयक आहे. तसेच पटावर नोंदवलेला प्रत्येक बालक दररोज शाळेत उपस्थित राहून त्यास गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा हक्क कायद्याने मान्य केला आहे. दीर्घ सुट्यांचा आनंद उपभोगुन शाळेत येणार्या बालकांना शाळा हवीहवीशी वाटावी, याकरिता बालकांना हसत खेळत शिक्षण देण्याच्या उद्देशाने शाळा स्तरावर शाळा प्रवेशोत्सव साजरा करणे गरजेचे आहे.

शाळा प्रवेशोत्सव २३जूनला साजरा करण्यासाठी विविध उपक्रम शाळेत राबविण्यात यावे असे आदेश जिल्हा



परीषदशिक्षण विभागाने शाळांना दिले आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी १०० शाळांनाजिल्हातील, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, जिप अधिकारी व शिक्षण विभागाचे अधिकारी, डायटचे प्राचार्य, सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी यांच्या भेटीत शाळा प्रवेशोत्सव साजरा होणार आहे.

**शाळा शुभारंभाचे नियोजन**

२१ जून २०२५ शाळेच्या परिसराची स्वच्छता आणि सुशोभीकरण करणे. वर्ग खोलींची किरकोळ दुरुस्ती करून वर्ग खोलीची स्वच्छता करून घेणे. अध्ययन अध्यापन साहित्य वर्गनिहाय वर्गात लावणे. शालेय पोषण आहार अंतर्गत धान्य व धान्यादी मालाची स्वच्छता करून घेणे. पिण्याच्या पाण्याची टाकी निर्जंतुक करूनघेणे. स्वच्छता गृहाची स्वच्छता करून पाण्याची सुविधा करणे. वृक्षारोपणाची तयारी करून घेणे. सकाळी योग दिन साजरा करणे. शासन निर्णय नुसार नमूद केलेल्या चार समितीची सभा घेवून सभेचे इतिवृत्त ठेवणे, गावातील सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी यांना प्रवेशोत्सवसाठी आवाहन करणे, फलक सुशोभित करून घेणे, सर्व लेखे अद्यावत करणे. (विद्यार्थी हजेरी, घटक नियोजन, मासिक नियोजन, वार्षिक नियोजन, शालेय पोषण अंतर्गत नोंद वही, इ.)२२ जूनला शाळेतील सर्व शिक्षकांची सभा काम वाटपाचे नियोजन करणे, १०० टक्के प्रवेश पात्र विद्यार्थीचे प्रवेश आवेदन पत्र भरून प्रवेशाचीकार्यवाही करून घेणे. नवगतांच्या स्वागताची पूर्वतयारी करणे. शाळेत नवीन प्रवेशित होणार्या बालकांच्या घरी भेटी देणे, २३ जून २०२५ नवीन प्रवेशित बालकांचे औक्षण करणे व बालकांचे पुष्पगुष्य देवून स्वागत करणे, विद्यार्थीची प्रभातफेरी काढणे, मोफत पाठ्यपुस्तक व शालेय गणवेशाचे वितरण करणे, शालेय पोषण आहारामध्ये गोड पदार्थाचे वाटप करणे, शाळा प्रवेशाचा अहवाल त्याच दिवशी सादर करणे, याप्रमाणे शाळा प्रवेशोत्सव दिवशी आपल्या अधिनस्त सर्व शाळांना कार्यवाही करण्याबाबत आदेशित करावे, असे आदेश गटशिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहे.

# विवेकानंद यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पिता -पुत्र गेल्या दहा महिन्यापासून भारत भ्रमण यात्रेवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि २०अमरावती**

भारतात शिक्षण व्यवस्था, मुलांचा मोबाईलचा अतिवापर, क्लायमेट चेंज, महापुरुषांचे विचार, संविधान जनजागृती,या संदर्भात नागरिकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. ही जनजागृती करन्यासाठी मूळ महाराष्ट्रीयन व नामदेव महाराजांचे वंशज असलेले मात्र सध्या राजस्थान व मुंबईत स्थायिक झालेले राधामोहन छिपा हे आपल्या दहा



वर्षीय मुलासोबत गेल्या दहा महिन्यापासून भारत भ्रमण यात्रेवर आहेत. महापुरुषांचे फोटो व संविधानाची प्रास्ताविका राधामोहन यांच्या कारवर लावलेली आहे,१५ ऑगस्ट २०२४ पासून त्यांनी ही यात्रा स्वत:च्या कार ने दिल्लीवरून सुरु केली असून आतापर्यंत २८ राज्यातील विविध जिल्ह्यात त्यांनी भेटी दिल्या आहेत, ४० हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. शाळेत विद्यार्थ्यांसोबत तसेच गावात जाऊन नागरिकांसोबत संवाद साधला.आपल्या देशातील शिक्षण व्यवस्थेत बदल झाले पाहिजे, विद्यार्थ्यांना शिक्षण हे ओझं वाटायला नको अनेक विद्यार्थी शिक्षणाच्या ओझ्यामुळे आत्महत्येसारखे पाऊल उचलतात, लहान विद्यार्थी मोबाईलच्या आहारी गेलेले आहे,महापुरुषांचे विचार सामान्य माणसा पर्यंत पोहोचावे हे यासाठी जनजागृती करण्यासाठी राधामोहन हे माहिती विवेकानंद ही थीम घेऊन भारतभ्रमण यात्रेवर निघाले आहेत. या भारतभ्रमण यात्रेनंतर राधामोहन हे आपल्या शिक्षणासंदर्भात व यात्रेत आलेल्या अनुभव सूचना केंद्र सरकारकडे देणार आहेत.

# प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा होणार

## चंद्रशेखर भोयर यांच्या पाठपुराव्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

वरिष्ठ व निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा करण्यात याव्या यासाठी भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक व शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी शासकीय स्तरावर पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश येऊन आता प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा होणार असून शिक्षण उपसंचालकांनी त्या संदर्भातील पत्र निर्गमित केले आहे.

अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यात वरिष्ठ व निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण सुरू असून अनेक शिक्षकांनी आपले प्रशिक्षण नामाणिकपणे पूर्ण केले आहे. परंतु शिक्षकांच्या अर्जित रजेचा विषयप्रलंबित होता. अर्जित रजा शिक्षकांच्या खात्यात जमा व्हाव्या आणि शिक्षकांना न्याय मिळावा यासाठी भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक व शिक्षक महासंघाचे अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी शासकीय स्तरावर पाठपुरावा केला.त्यांच्या या पाठपुराव्याला यशआले असून शिक्षण उपसंचालकांनी अर्जित रजा शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यासंदर्भात पाचही जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकार्यांना एका पत्राद्वारे निर्देशित केले आहे. परिणामी शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी चंद्रशेखर भोयर यांचे आभार मानले आहे.

### शिक्षकांच्या हक्कासाठी कटिबद्ध : भोयर

अर्जित रजा बाबत केलेल्या मागणीची शासकीय स्तरावरून



दखल घेण्यात आली असून संबंधित कार्यालयाने वरिष्ठ व निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा करण्या संदर्भातील अधिकृत पत्र निर्गमित केले आहे. हे यश शिक्षक बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिल्याचे फलित असून शिक्षकांच्या हक्कासाठी आपण कटिबद्ध असल्याचे भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश महासंघाचे अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी सांगितले.

# दिवसभरात १५ मिमी पावसाची नोंद:मान्सूनचे आगमन; पुढील तीन दिवस जिल्ह्यामध्ये पावसाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

शहरासह जिल्ह्यात गुरुवारी मान्सून बरसला. पावसाने सर्वच तालुक्यांत हलक्या ते मध्यम प्रमाणात हजेरी लावली. अमरावती शहरात दिवसभरात १५ मिमी पावसाची नोंद झाली. गुरुवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. दुपारी २.३० वाजता मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू झाला. तो सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होता.झारखंड आणि लगतच्या पश्चिम बंगालवर ठळक कमी दाबाचे



क्षेत्र सक्रिय आहे. तसेच ७.६ किमी उंचीवर चक्राकार वारे वाहत असून, राजस्थानवर चक्राकार वारे वाहत आहे. त्यामुळे पाऊस सुरू असून जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पेरणीला सुरूवात केली आहे.

मान्सूनचे आगमन झाले असून पुढील तीन दिवस जिल्हाभरात मध्यम पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २२ ते २४ या कालावधीत विखुरलेल्या स्वरुपात पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुन्हा २५ जूनपासून पावसाचे प्रमाण वाढू शकते.

**-प्रा. अनिल बंड,**
**हवामानतज्ज्ञ, श्री शिवाजी कृषी महाविद्यालय.**

# ग्रुपने लालपरी बुक करा कमी तिकिटात विठ्ठल दर्शनाला जा

## एसटी महामंडळाची योजना : पंढरपूर यात्रेसाठी भाविकांची विशेष सोय

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे भाविकांचा ओघ सुरू आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक विशेष योजना सुरू केली आहे. यामध्ये एका गावातून ५० किंवा त्याहून अधिक भाविकांनी एकत्र येऊन बुकिंग केल्यास त्याच गावातून थेट पंढरपूरकडे विशेष बस सोडण्यात येणार आहे. ही सेवा जिल्ह्यातील कोणत्याही गावासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील भाविकांना आधी तालुक्याला किंवा जिल्हा मुख्यालयाला जाऊन बस पकडण्याची आवश्यकता राहणार नाही.



आषाढीनिमित्त काही भाविक अमरावती जिल्ह्यातील विविध गावांतून वारकरी पंढरपूरकडे जात असतात. या भाविकांच्या सोयीसाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. मागणी केल्यास आषाढी एकादशीसाठी बसेस सोडण्यात येणार आहेत. मागील वर्षी एसटी महामंडळाकडून १५५ बसेस सोडण्यात आल्या होत्या. ज्या गावातून चाळीसपेक्षा जास्त भाविक एकत्र बुकिंग करतील त्यांच्यासाठी गावातून एसटी सोडली जाईल. महिला, ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनाने सवलती सुरू केल्या आहेत. या सवलतींचा लाभ विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी करता येणार आहे.

**गावात येणार बस**

एकत्र तिकिटाचे बुकिंग असणाऱ्या गावातून थेट एसटी बस पाठविण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. यामुळे भाविकांना गावातूनच प्रवासाची सोय उपलब्ध होईल.

**महिलांना तिकिटात सवलत**

एसटी महामंडळाकडून महिला प्रवाशांना तिकिटात पन्नास टक्के सवलत देण्यात येते. गावातून बुकिंग होणाऱ्या बसमध्ये देखील महिलांना तिकिटात सवलत असणार आहे.

# नवीन सर्व दुचाकींना 'एबीएस आणि दोन हेल्मेट' सक्तीचे

## केंद्रीय परिवहन मंत्रालयाचा निर्णय : डॉन हेल्मेट सक्तीच्या निर्णयाला ही मंजूरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

रस्ते अपघात नियंत्रणात आणण्यासाठी केंद्रीय परिवहन मंत्रालयाने आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ जानेवारी २०२६ पासून बाजारात येणाऱ्या नवीन दुचाकींसाठी (स्कूटर आणि मोटारसायकल) एबीएस सक्तीचे करण्याच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली आहे. त्याचबरोबर नवीन दुचाकी दोन हेल्मेटही अनिवार्य करण्यात आले आहेत.




केंद्रीय परिवहन आणि महामार्ग मंत्रालयाने या निर्णयाची घोषणा केली आहे. वाढते रस्ते अपघात, त्यातून होणारे मृत्यू याला आळा घालण्यासाठी केंद्रीय मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे. सध्या एबीएस १२५ सीसी इंजिन क्षमता असलेल्या दुचाकींसाठीच सक्तीचे हे. म्हणजे सध्या देशातील अंदाजे ४० टक्के दुचाकींना एबीएस सुरक्षा प्रणाली नाहीये. पण, आता सर्वच प्रकारच्या इंजिन असलेल्या दुचाकींसाठी हे सक्तीचे करण्यात आले आहे.एबीएस वाहनाच्या ब्रेक प्रणालीमध्ये वापरण्याचा मुख्य उद्देश म्हणजे अचानक वाहनाचा ब्रेक दाबल्यावर त्याची चाके लॉक होऊ नयेत. अचानक ब्रेक लावल्यानंतर वाहनांचे संतुलन बिघडते. त्यामुळे वाहनावर नियंत्रण राहत नाही. ते टाळण्यासाठी आणि वाहन घसरू होऊ नये याची मदत होते.

एबीएसमुळे ब्रेक लावल्यानंतरही चाके लॉक न होता फिरत राहतात. तसेच रस्ता ओलसर किंवा घसरट असतानाही वाहनावर नियंत्रण ठेवता येते. त्यामुळे वाहन अपघाग्रस्त होण्यापासून टाळता येते.

**दोन हेल्मेट हवेच**

केंद्र सरकारकडून एबीएस बरोबरच नवीन दुचाकी देताना दोन बीआयएस प्रामाणित हेल्मेट देणे अनिवार्य केले जाणार आहे. सध्या एकच हेल्मेट देणे सक्तीचे आहे. भारतात रस्ते अपघातात होणाऱ्या मृत्यूंपैकी ४४ टक्के मृत्यू हे दुचाकी वापरणाऱ्याचे होत आहेत. बहुतांश वेळा मृत्यू डोक्याला मार लागल्याने होत आहेत. त्यामुळे सरकारकडून या निर्णयाला मंजुरी देण्यात आली आहे.

## जन्म मृत्यु दाखले वितरण शिबीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

अमरावती महानगरपालिका प्रशासन मार्फत शनिवार दिनांक २१जून व रविवार दि.२२जून रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या कालावधीमध्ये तयार झालेले जन्म मृत्यु दाखले वितरण शिबीराचे आयोजन पाचही झोनमध्ये करण्यात आलेले आहे. आगामी येणा-या शैक्षणिक सत्राच्या अनुषंगाने झोन स्तरावर दाखले वितरीत करण्याकरीता शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या नागरिकांनी जन्म मृत्यु दाखल्याकरीता महानगरपालिका झोनस्तरावर अर्ज केला आहे. त्या नागरिकांनी त्या झोनवर जाऊन शिबीराचा लाभ घ्यावा. शिबीरामध्ये १ जानेवारी,२०२५ ते ३० मे,२०२५ पर्यंतचे तयार झालेले दाखले वितरीत करण्यात येणार आहे.

# दलित विकास योजनेंतर्गत कोट्यवधींचा अपहार

## अचलपूर नगर परिषदेत ४७ कोटींचा गैरवापर! दोषींवर विभागीय चौकशीचा आदेश : दोषींना शासनाची नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अचलपूर**

अनुसूचित जाती वस्तीचा विकास योजनेत अचलपूर नगर परिषदेने अनुदानित रकमेचा गैरवापर केल्याप्रकरणी दोषी मुख्याधिकारी, अधिकाऱ्यांसह पदाधिकाऱ्यांची विभागीय चौकशी होणार आहे. नगर विकास विभागाने १८ जून रोजी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या नावे पत्र पाठवून दोषींची विभागीय चौकशी करून अहवाल शासनास पाठविण्याचे निर्देश दिले आहेत.

नगर विकास विभागाचे अवर सचिव अजित पालवे यांच्या पत्रानुसार अचलपूर नगर परिषदेत दलित वस्ती विकास करण्याचा निधीत गैरप्रकार झाल्याबाबत राज्य मानवी हक्क आयोग येथे प्रकरण क्रमांक ६१४२/२०१८ चा दाखला देण्यात आला.



याप्रकरणी किशोर मोहोड यांचा २३ एप्रिल रोजीचा अर्जदेखील सादर होता. जबाबदार संबंधित अधिकारी, पदाधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी करण्याचे निर्देश आयोगाने राज्य शासनास दिले आहे.

**४७.४० कोटींच्या शासकीय निधीचा गैरवापर**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका क्रमांक ५२४५/२०२४ अन्वये अण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती निधीत गैरप्रकार झाल्याची बाब याचिकाकर्ते किशोर मोहोड यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली आहे. प्रायोगिक तत्त्वावर अचलपूर नगरपरिषदेत सन २०१० ते २०१९ या कालावधीत मुख्याधिकाऱ्यांनी ४७कोटी ४० लाखांच्या शासकीय निधीचा कायमस्वरूपी गैरवापर केल्याचे पुराव्यानिशी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

## २५ जूनला जिल्हा वकील संघातर्फे सरन्यायाधीश गवई यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा मायभूमी अमरावतीमध्ये बुधवार, २५ जून रोजी नागरी सत्कार आयोजित केला आहे. हा कार्यक्रम पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे. अमरावती जिल्हा वकील संघाने त्यासाठी पुढाकार घेतला असून सायंकाळी ७ वाजता हा कार्यक्रम सुरू होईल. या कार्यक्रमाला अनेक गणमान्य पाहुणे उपस्थित राहणार आहेत. न्या. भूषण गवई यांनी अमरावतीत आपल्या वकिलीचा प्रारंभ केला होता. पुढे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय आणि आता थेट भारताचे सरन्यायाधीश असा त्यांचा प्रवास आहे. त्यामुळे अमरावतीत होणाऱ्या या सत्काराला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

# गणवेश विसरले, नियम झुगारले रिक्षाचालकांना आवरणार कोण?

## कारवाईबाबत वाहतूक पोलिसांची उदासीनता; रिक्षाचालकांना गणवेश बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

अनेकदा शहरात सार्वजनिकवाहतूक करणाऱ्या काळी पिवळी टॅक्सी चालक तसेच रिक्षाचालकांकडून सर्रास नियम मोडले जातात. रिक्षाचालकांना बंधनकारक असलेल्या गणवेशाचा वापर त्यांच्याकडून केला जात नाही. नियम मोडणाऱ्या या चालकांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात नाही. त्यामुळे त्यांचे मनोबल उंचावल्याचे प्रवाशांकडून बोलले जात आहे.मोटार वाहन कायदा, १९८८ हा



देशात रस्ते वाहतुकीचे नियमन करणारा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यात वाहन चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या परवान्यांपासून, वाहनांच्या नोंदणीपर्यंत आणि वाहतुकीचे नियम, तसेच उल्लंघनासाठी दंड आणि विमा यांसारख्या अनेक गोष्टींचा समावेश आहे. वाहन चालवण्यासाठी वैध परवाना असणे आवश्यक आहे. सर्व मोटार वाहनांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. एवढेच नाही तर मुदतबाह्य वाहने चालविल्यास दंडाची तरतूद आहे. परंतु तरीही कालबाह्य वाहने रस्त्यावर धावतांना दिसतात.

**गणवेशासोबत बॅचही दिसत असतो गायब**

मोटार वाहन कायदा व शासनाच्या नियमानुसार रिक्षा व काळी पिवळी टॅक्सीचालकांना गणवेशासोबत बॅचही जवळ ठेवणे आवश्यक आहे. मात्र, काही वाहनचालकांकडे या दोन्ही गोष्टी नसतात.

**ग्रामीण भागात सर्वाधिक नियमांची पायमल्ली**

ग्रामीण भागात अनेकदा वाहतूक नियम धाब्यावर बसविले जातात. विशेष म्हणजे काळी पिवळी टॅक्सी चालक प्रवासी सुरक्षेकडे फारसे लक्ष देत नाही. जुने व दुरवस्था असलेले तसेच भंगार वाहन मार्गावर चालविताना दिसून येतात. भंगार वाहनामुळे अनेकदा वाहने उलटल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

# मुंबई आमची म्हणणाऱ्यांनी मराठी माणसासाठी काय केले?

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा उद्धव ठाकरेंना सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचा ५९ वा वर्धापनदिन सोहळा मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात पार पडला. यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पक्ष फोडाफोडी आणि नेत्यांच्या पळवापळवीच्या राजकारणावरून भाजपा आणि एकनाथ शिंदे गटावर टीका केली.

महाराष्ट्र नवनिर्माण पक्षाचे नेते राज ठाकरे यांच्याशी संभाव्य युतीबाबत चाललेल्या चर्चेवरही त्यांनी भाष्य केले. मराठी माणूस एकत्र येऊ नये, यासाठी शेठजींचे दिल्लीतील नोकर आणि नोकरांचे



नोकर प्रयत्न करत असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. तसेच अभिनेते नाना पाटेकर यांच्या प्रहार चित्रपटातील एका संवादाचा आधार घेत त्यांनी एकनाथ शिंदे गटाला थेट आव्हान दिले. यावर आता विविध राजकीय पक्षातून प्रतिक्रिया उमटत आहेत. भाजप प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली आहे.

उबाठा गटाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमातील उद्धव ठाकरेंचं भाषण म्हणजे पराभवाच्या भीतीनं ओकलेली हतबलताच होती. जेव्हा जनाधार संपतो, तेव्हा आरोळ्या वाढतात. तेच आज त्यांनी केलं.

शिवसेना संपली नाही म्हणत असताना, स्वतःतर 'सेना' गमावलीच, पण 'शिव' आणि 'हिंदुत्व' हे दोन आधारस्तंभही सोडून उद्धव ठाकरे तुम्ही सोनिया चरणी नतमस्तक झालात. पंतप्रधान मोदी, अमित शहा, देवेंद्र फडणवीस यांच्यावर वैयक्तिक आरोप करणं सोपं आहे, पण हे नेते जेव्हा देशभर, राज्यभर दौरे करत होते, तेव्हा उद्धव ठाकरे मातोश्रीतून ऑनलाईन भाषण करत होते. हे महाराष्ट्रातील जनतेनं बघितलेलं आहे. जे 'मुंबई आमची' म्हणतात, त्यांनी आधी सांगावं की, मुंबईतल्या मराठी माणसाचं काय केलं? महापालिकेत सत्ता असतानाही त्यांच्या झोपड्या, पाण्याच्या योजना, शिक्षण, आरोग्य यावर काही केलं का?असा सवाल हि बावनकुळे यांनी केला.

# देवा, भरू दे यंदा मृगाचं आभाळ

## वरुणराजाला आर्जव : नजरा लागल्या आभाळाकडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मोर्शी**

रात्रंदिवस काबाडकष्ट करूनशेतकरी शेतात राबराब राबतो. त्यांच्या घामाच्या धारांचे मोती होतात, तेव्हा कुठं धान्य हाती लागते. गेल्या अनेक वर्षापासून निसर्गाची अवकृपा होत असल्याने शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होत आहे. वर्षभर मेहनत करूनही कुटुंबीयांना घास भरवणे कठीण होत आहे. पाचवीलाच पुजलेली संकटे झेलत मोठ्चा हिंमतीने बळीराजा नव्या हंगामासाठी तयार झाला असून, यंदा तरी निसर्ग व वरुणराजा प्रसन्न व्हावा, म्हणून 'भरू दे यंदा मृगाचं आभाळ,



नावाचा तुझ्या गजर करीना' अशा अपेक्षेचे साकडे बळीराजा देवाजवळ घालीत आहे.

जिल्ह्यात सिंचन क्षेत्राची वानवा आहे. त्यामुळे बहुतांश शेतकरी निसर्गाच्या पावसावर विसंबून आहेत. मागील अनेक वर्षापासून निसर्गाचा समतोल दिवसेंदिवस बिघडत चालला आहे. मान्सूनचे चाहूल लागली असून, बळीराजा पूर्वपावसाळी कामात गुंतला आहे. यंदा बियाणांच्या किमती वाढल्याने शेतकरी चिंतित आहेत. उसनवारी करून खरिप लागवडीच्या तयारीत आहे.

**पावसा रुसलास का?**

मृग नक्षत्र लागून आठवडा उलटला, तरी दमदार पावसाची सर जमिनीवर आली नाही. त्याऐवजी वाढलेल्या तापमानाने बाष्पयुक्त वातावरणात उकाड्याची तीव्रता त्रास देत असून, अस्वस्थता वाढली आहे.

# नागपूर- इंदूर विमानाच्या काकपिटचे दार अचानक उघडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

नागपूर येथून इंदूरकडे जाणाऱ्या इंडिगो एअरलाईन्सच्या विमानाच्या काकपिटचे दार अचानक उघडले. नागपूरच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही घटना घडली. अलीकडे कोचीन ते दिल्ली विमानाचे इमर्जन्सी लँडिंग नागपुरात करण्यात आले होते. कोचीन येथील एअर ट्रॅफिक कंट्रोल विभागाला बॉम्ब धमकीचा संदेश प्राप्त झाल्यानंतर तत्काळ हे विमान नागपूर विमानतळावर वळविण्यात आले. नागपूर येथे ते सुरक्षितपणे उतरले. या विमानात १५७ प्रवासी आणि सहा क्रू सदस्य प्रवास करत होते.

शुक्रवारी परत एकदा इमर्जन्सी लँडिंग करण्याची वेळ थोडक्यात टळली. नागपूर




येथून इदूरकडे निघण्यास सज्ज विमानाच्या काकपिटचेदार आपोआप उघडले. वैनिकाच्या लगेच लक्षात ही बाब अली. त्याने सूचना दिली आणि विमान दुरुस्तीला पाठवण्यात आले. काकपिटचे दार दुरुस्त केल्यानंतर हे विमान इंदूर कडे रवाना झाले, अशी माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान,इंडिगो एअरलाईन्स आणि अन्य संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून सर्व सुरक्षा प्रक्रिया काटेकोरपणे राबवण्यात आल्या. मिहान इंडिया लिमिटेड, केंद्रीय औद्योगिक सुरक्षाबल अंतर्गत एअरपोर्ट सुरक्षा बल, विमानतळ बॉम्ब शोध पथक व नागपूर शहर पोलिसांचे बॉम्ब शोध पथक, एस आय बी, इंडिगो एअरलाईन्स, सोनगाव पोलीस ठाणे आदी यंत्रणांनी उत्तम समन्वय साधून कारवाई पार पाडली गेली.